RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि.13 जानेवारी 2026



1936 पुणे येथे धर्मांतर प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी परिषद.

1936 शिरवांच्या भजन कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.

मंगळवार, १३ जानेवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : १९ | दैनिक | किंमत : ₹५/-

Tuesday, 13 January 2026 | Year : 6 | Issue : 19 | Daily | Rate: Rs. 5/-

मुंबई, नागपूर, पुण्यासह राज्यात सर्व 29 महापालिका क्षेत्रात

# 13 ते 16 जानेवारी या चार दिवस 'ड्राय डे'




## निवडणूक काळात शांतता, सुरक्षितता राखण्यासाठी घेतला निर्णय

**मुंबई :** राज्यात 29 महापालिका क्षेत्रात येत्या 15 जानेवारीला मतदान होणार आहे. मुंबईत भाजप विरूद्ध ठाकरे बंधू, पुण्यात भाजप विरूद्ध अजित पवारांची राष्ट्रवादी अशा अनेक चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत. अशातच निवडणूक आयोगदेखील सर्वप्रकारच्या गोष्टींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवत आहे. महापालिका निवडणुकांसाठीचा प्रचार 13 जानेवारीला संपणार आहे. त्यानंतर राजकीय पक्षांकडून कुठलीही आमिष दिले जाऊ नये या हेतुने राज्यात 13 ते 16 जानेवारी या कालावधीत जिथे महापालिका निवडणुका आहेत, तिथे ड्राय डे लागू करण्यात आला आहे.

प्रचाराच्या तोफा थंडावताच मंगळवारी सायंकाळी 6 वाजेपासून राज्यात सर्व 29 महापालिका क्षेत्रात ड्राय डे असणार आहे. जिथे जिथे निवडणुका आहेत, तिथे दारूची दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. राज्यात 29 महानगरपालिकांची निवडणूक होत आहे. ***यात मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर महानगरांमध्ये महानगरपालिका निवडणुका होत आहेत.*** त्यामुळे पुढील चार दिवस या महानगरपालिकांच्या हद्दीत ड्राय डे लागू असेल. राज्यातील 29 शहरांमध्ये 15 जानेवारीला सुट्टी; कोणत्या शहरांचा समावेश, पहा संपूर्ण यादी

निवडणूक काळात शांतता, सुरक्षितता आणि शिस्त राखण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. मद्यपानाला बंदी घातल्याने मतदानावेळी मतदारांना सुरक्षित वातावरण मिळेल. निवडणूकसंबंधी गैरप्रकार, गोंधळ, दंगल टाळता येईल. तसेच मतदारांना आमिष म्हणून मद्य देण्याच्या घटनाही घडल्याचे दिसून आले होते. तसे प्रकार टाळण्यासाठी या चार दिवसांत ड्राय डे घोषित करण्यात आला आहे. यासंदर्भात दुकानदारांना पूर्वकल्पना देण्यात आली आहे.

# दैनिक बहुजन सौरभ तर्फे माजी सरन्यायाधीश भुषण गवई यांचा सत्कार



**नागपूर :** भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. भुषण गवई यांचाा दैनिक 'बहुजन सौरभ'चे मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे यांनी सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या नव्या अस्तित्व, एकजूट व पुनरुज्जीवनासाठी मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी चर्चा केली. यावर बोलताना न्या. भुषण गवई यांनी संविधानाच्या चौकटीत राहून समाजाच्या व समुदायाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी हा विषय गांभीर्याने पाहू, असे सांगितले.

ॲड. डॉ. कांबळे म्हणाले की, आजचे राजकारण अधिकाधिक दूषित झाले असून, त्याचा थेट फटका बहुजन, दलित व संविधानवादी चळवळीला बसत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित राजकारण पुन्हा केंद्रस्थानी आणणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सत्कारप्रसंगी नागपूर बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे हे ॲड. डॉ. कांबळे यांच्यासोबत उपस्थित होते. तसेच परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे विश्वस्त एन.आर. सुटे, तसेच प्रशांत सुटे आणि प्रशांत भोसले हे प्रामुख्याने उपस्थित होते.

# डेंटलच्या 72 निवासी डॉक्टरांचे 'कामबंद' आंदोलन




**नागपूर :** शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील (डेंटल) निवासी डॉक्टरांच्या संयमाचा सोमवारी अखेर बांध फुटला. मागील तीन महिन्यांपासून हक्काचे विद्यावेतन न मिळाल्याने संतप्त झालेल्या जवळपास 72 निवासी डॉक्टरांनी सोमवारी 'कामबंद' आंदोलन पुकारले. ऐन परीक्षेच्या आणि अभ्यासाच्या काळात खिशात दमडीही नसल्याने या डॉक्टरांवर उपासमारीची वेळ आली असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे रुग्णसेवा वाऱ्यावर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'डेंटल'मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे (पीजी) तीन वर्षांचे एकूण 72 निवासी डॉक्टर कार्यरत आहेत. एका निवासी डॉक्टरला दरमहा सुमारे 70 हजार रुपये विद्यावेतन मिळते. याच रकमेतून त्यांना आपला दैनंदिन खर्च, मेसचे बिल आणि महागड्या वैद्यकीय साहित्याचा खर्च करावा लागतो. मात्र, ऑक्टोबर महिन्यापासून हे विद्यावेतन रखडले आहे. वारंवार विनंत्या करूनही केवळ आश्वासने मिळत आहेत. घरून पैसे मागवायचे किती दिवस? प्रशासनाला आमच्या पोटापाण्याची काळजी नाही का? सकाळी 11.30 वाजता डेंटलला भेट दिली असताना 50हून अधिक निवासी डॉक्टर अधिष्ठाता कक्षाच्या मागील ओपन सभागृहात ठिय्या मांडून होते. काही डॉक्टरांना या बाबत विचारले असता, त्यांनी ऑक्टोबरपासून विद्यावेतन मिळाले नसल्याचे सांगितले. मात्र, काही डॉक्टरांनी आज प्रश्न सुटेल, असे आश्वासन अधिष्ठाता डॉ. फडणाईक यांनी दिल्याचे सांगून कामबंद आंदोलन नसल्याचेही पुष्टी दिली. यावरून हे विद्यार्थी कोणाला घाबरत आहे का, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. मात्र, आठवड्याचा पहिला दिवस रुग्णांची गर्दी असताना निवासी डॉक्टर मदतीला नसल्याने रुग्णांचे हाल झाले.

## महत्त्वाच्या बातम्या

### काँग्रेसचाच झेंडा फडकणार ...

**नागपूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने पैसा, पोलीस, प्रशासन व निवडणूक आयोगाच्या जोरावर संस्कृती, संकेत व परंपरा पायदळी तुडवत लोकशाहीचा तमाशा चालवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत अहंकारी असून ते विरोधी पक्षांवर बुलडोझर चालवत आहेत. पण या बुलडोझरला न घाबरता काँग्रेस कार्यकर्ता निर्धाराने उभा राहिला. म्हणूनच नगरपालिकेत 41 नगराध्यक्ष व 1006 नगसेवक विजयी झाले. नगरपालिकेप्रमाणेच महानगरपालिकातही काँग्रेसचा विजयी झेंडा फडकवू, असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

### माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड एम्समध्ये दाखल

**नवी दिल्ली :** माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना सोमवारी नवी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) मध्ये दाखल करण्यात आले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आठवड्यात दोनदा बेशुद्ध पडल्यानंतर त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले आहे, जिथे त्यांचे एमआरआय आणि इतर चाचण्या केल्या जातील. अधिकाऱ्यांनी सांगितले की, 10 जानेवारी रोजी धनखर दोनदा वॉशरूममध्ये बेशुद्ध पडले. त्यानंतर ते सोमवारी नियमित तपासणीसाठी एम्समध्ये गेले, परंतु त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना दाखल करण्याचा सल्ला दिला.

### महाराष्ट्रात तीव्र थंडीचा इशारा!

**मुंबई :** उत्तरेकडून अतिवेगाने सरकणाऱ्या शीतलहरींमुळे देशभरात थंडीचा कडाका वाढत आहे. भारतीय हवामान खात्याने 12 जानेवारीला राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्लीसह हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि ईशान्य भारतात तीव्र थंडीचा इशारा जारी केला आहे. उत्तर-पश्चिम भारतात किमान तापमानात मोठी घसरण होत असून जनजीवनावर त्याचा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. दरम्यान महाराष्ट्रातही थंडीचा प्रभाव वाढला आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये किमान तापमानात लक्षणीय घट नोंदवली गेली असून, विशेषतः उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात शीतलहरींसदृश स्थिती निर्माण झाली आहे. या भागांत पहाटे आणि सकाळच्या वेळेत थंडी अधिक जाणवणार असून नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### संविधानाच्या प्रतिकृतीची नासधूस करणाऱ्या आरोपीने घेतला गळफास

**परभणी :** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिकृतीची नासधूस करणारा आरोपी दत्ता सोपान पवार याने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सोमवारी (दि.12) घडली. आरोपी नेमकाच जामिनावर आला होता. परभणी तालुक्यातील मिर्झापूर या आपल्या गावी परतल्यानंतर त्याने हे पाऊल उचलले. याबाबत अधिक माहिती अशी की शहरात 10 डिसेंबर 2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात संविधानाच्या प्रतिकृतीची दत्ता पवार याने नासधूस केली होती. या घटनेनंतर तिथे प्रत्यक्षदर्शी असलेल्या लोकांनी दत्ता पवार याला पोलिसांकडे पकडून दिले. पोलिसांनी त्यास अटक केली. या घटनेच्या निषेधार्थ दुसऱ्याच दिवशी शहरात बंद पुकारण्यात आला.
















बहुजन सौरभ **संपादकीय**

# लोकशाहीची कसोटी

महाराष्ट्र राज्यात महानगरपालिका निवडणुकांचा जोर दिवसेंदिवस वाढत चालला असून येत्या 15 जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राजकीय वातावरण तापले आहे. राज्यातील सर्वच प्रमुख आणि स्थानिक राजकीय पक्षांनी आपापल्या रणनीती आखून निवडणूक रणांगणात उडी घेतली आहे. कोण जिंकणार? कोण हरणार? कोणाची मुस्कटदाबी होणार? अशा प्रश्नांनी सध्या राजकीय चर्चेला उधाण आले आहे. महानगरपालिका निवडणुका या केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडीपुरत्या मर्यादित नसून त्या राज्य व राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या चाचणी निवडणुका मानल्या जातात. त्यामुळेच सत्ताधारी आणि विरोधक दोघांसाठीही या निवडणुका प्रतिष्ठेचा विषय ठरल्या आहेत. रणनीतींची जंत्री आणि उमेदवारांची गर्दी. सर्वच पक्षांनी विजय हमखास आपलाच असल्याचा दावा केला आहे. उमेदवार निवडताना जातीगत समीकरणे, प्रभाग रचना, स्थानिक प्रभावशाली गट, आर्थिक ताकद आणि सोशल मीडियावरील पोहोच यांचा सखोल अभ्यास केल्याचे दिसते. अनेक ठिकाणी बंडखोरी, आघाडी-युतीतील मतभेद आणि अपक्ष उमेदवारांची वाढ हे चित्र स्पष्टपणे जाणवते. उदाहरणार्थ, काही महानगरपालिकांमध्ये एका पक्षाचे दोन-दोन गट परस्परविरोधात उभे ठाकले आहेत. तर काही ठिकाणी कालपर्यंत विरोधी विचारसरणीत असलेले नेते आज एकाच व्यासपीठावर दिसत आहेत. ही स्थिती सत्तेसाठी विचारधारेची लवचिकता किती टोकाला गेली आहे याचेच द्योतक आहे. आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय कुरघोड्या, निवडणूक प्रचाराच्या काळात आरोप-प्रत्यारोप हे नवे राहिले नाहीत. भ्रष्टाचार, गैरकारभार, विकासकामांतील अपयश, निधीचा अपव्यय, प्रशासकीय हस्तक्षेप अशा मुद्द्यांवरून एकमेकांवर टीकेचे बाण सोडले जात आहेत. काही ठिकाणी वैयक्तिक टीका, जुने प्रकरणे उकरून काढणे, समाजमाध्यमांवरून बदनामी मोहीम राबविणे हेही प्रकार घडत आहेत. यामुळे निवडणूक चर्चेचा केंद्रबिंदू नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा सत्तासंघर्षाकडे झुकताना दिसतो आहे. पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, झोपडपट्टी पुनर्वसन यांसारखे मूलभूत नागरी प्रश्न प्रचारात दुय्यम ठरत आहेत, ही बाब चिंताजनक आहे. लोकशाहीचा आत्मा आणि मतदारांची भूमिका या सर्व घडामोडींमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार. राजकीय पक्ष कितीही दावे-प्रतिदावे करत असले तरी अंतिम निर्णय मतदारांच्या हातात आहे. गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदारांनी अचानक निकाल देऊन अनेक राजकीय समीकरणे कोलमडून टाकल्याची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. मतदारांनी भावनिक, जातीगत किंवा तात्कालिक आमिषांना बळी न पडता कामगिरी, पारदर्शकता आणि भविष्यातील दृष्टीकोन यांचा विचार करून मतदान करणे ही काळाची गरज आहे. कारण महानगरपालिकेतील निवडून आलेले प्रतिनिधी हे थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले असतात. 15 जानेवारीचे मतदान हे केवळ उमेदवारांचे भविष्य ठरवणारे नसून महाराष्ट्रातील राजकीय प्रवाह, पक्षांची ताकद आणि जनतेचा कल स्पष्ट करणारे ठरणार आहे. कोण जिंकणार, कोण हरणार यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे लोकशाही जिंकते का? हा खरा प्रश्न आहे. सत्तेच्या राजकारणात अडकलेल्या या रणधुमाळीत नागरिकांचे प्रश्न केंद्रस्थानी राहतील का, की ते पुन्हा एकदा दुर्लक्षित होतील, याचे उत्तर येणारा निकाल देईल. लोकशाहीची खरी ताकद ही मतपेटीत असते, हे विसरून चालणार नाही. महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव असायला हवा होता. पण प्रत्यक्षात त्या सत्तेचा बाजार, पैशांचा माज आणि जाती-धर्माच्या धृवीकरणाचा तमाशा बनताना दिसत आहेत. येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होत असताना सर्वच राजकीय पक्ष विजयाचे दावे करत आहेत; मात्र संविधान, सामाजिक न्याय आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न या प्रचारात हरवले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फार पूर्वीच या धोक्याचा इशारा दिला होता. संविधान सभेत ते स्पष्टपणे म्हणाले होते, ‘लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून ती मुळात समाजाची जीवनपद्धती आहे.’ आजच्या महानगरपालिका निवडणुकांकडे पाहिले तर ही जीवनपद्धती तुडवली जात आहे आणि लोकशाही केवळ मतांची बेरीज बनवली जात आहे. संविधानातील भाग ढ्ढङ्ग ने महानगरपालिका व नगरपरिषदांना स्वायत्तता दिली, कारण डॉ. बाबासाहेबांना सत्ता दिल्ली किंवा मंत्रालयात नव्हे, तर वॉर्ड आणि वस्तीत पाहायची होती. पण आज या संस्थाच पक्षीय राजकारणाच्या कैदेत अडकल्या आहेत. उमेदवार लोकसेवक म्हणून नव्हे, तर सत्तेचे एजंट म्हणून उभे राहतात. पैसा, बाहुबल, जातीय समीकरणे आणि पक्षनिष्ठा याच निकषांवर तिकीटे वाटली जातात. हे पाहता डॉ. बाबासाहेबांचे शब्द आठवतात, ‘राजकीय सत्ता ही सामाजिक व आर्थिक न्यायासाठी वापरली गेली नाही, तर ती शोषणाचे साधन बनते.’ आज महानगरपालिकांमध्ये नेमके तेच घडत आहे. लोकांचे प्रश्न कुठे गेले? निवडणूक प्रचारात भ्रष्टाचाराचे आरोप, वैयक्तिक टीका, जातीचे गणित आणि धार्मिक धृवीकरण यांना उधाण आले आहे. मात्र पाणी, आरोग्य, स्वच्छता, वाहतूक, झोपडपट्टी पुनर्वसन, महिला सुरक्षा हे प्रश्न चर्चेत नाहीत. डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक लोकशाहीबाबत स्पष्ट भूमिका मांडली होती, ‘राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल, जेव्हा तिच्या पायावर सामाजिक लोकशाही उभी राहील.’ आज सामाजिक लोकशाहीची पायाभरणीच उद्ध्वस्त केली जात आहे. त्यामुळे राजकीय लोकशाही केवळ खोटा देखावा ठरत आहे. बहुजन प्रतिनिधित्व नावापुरते, अधिकाराविना आरक्षणामुळे दलित, आदिवासी, महिला, मागासवर्गीय प्रतिनिधी निवडून येतात, हे खरे. पण निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज दाबला जातो. स्थायी समित्या, निधी वाटप, ठेकेदारी, या सगळ्यांवर मुठभर सत्ताधारींचे वर्चस्व राहते. याच संदर्भात डॉ. बाबासाहेबांचा कडवा इशारा आजही लागू पडतो, ‘समानतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे मोजक्या लोकांची सत्ता आणि बहुजनांची गुलामगिरी.’ महानगरपालिकांमध्ये आज बहुजनांची अवस्था नेमकी अशीच झाली आहे. मतदारांना डॉ. बाबासाहेबांचा सवाल, डॉ. बाबासाहेबांनी मतदारांना कधीच अंधनिष्ठा शिकवली नाही. उलट ते म्हणाले, ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.’ आजचा संघर्ष मतपेटीतून करायचा आहे. मतदारांनी जातीच्या, धर्माच्या आणि पक्षाच्या चौकटीबाहेर जाऊन विचार केला नाही, तर हे निवडणूक रणांगण संविधानविरोधी शक्तींना बळ देणारे ठरेल. डॉ. बाबासाहेबांचे संविधान जिंकले पाहिजे. 15 जानेवारीला कोण जिंकेल, कोण हरेल, हे तात्पुरते आहे. खरा प्रश्न हा आहे की, डॉ. बाबासाहेबांनी दिलेले संविधान जिंकते का? की, ते पुन्हा सत्तेच्या चिखलात तुडवले जाते? डॉ. बाबासाहेबांनी शेवटचा इशारा देताना म्हटले होते, ‘संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणारे लोक वाईट असतील, तर ते अपयशी ठरेल.’ महानगरपालिका निवडणुका या त्या इशाऱ्याची कसोटी आहेत. सत्ता येईल-जाईल, पण संविधान, समता आणि सामाजिक न्याय टिकले पाहिजे, हीच खरी आंबेडकरी भूमिका आहे. ■ ■

---

**मागास उमेदवाराची खुल्या प्रवर्गात गुणवत्तेवर निवड**

# सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, पण अट अजूनही कायम

**अलीकडच्या काळात अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांच्या गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गात निवडीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दोन निर्णय मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहेत. मागावर्गीय समूहास दिलासा मिळाला असे चित्र रंगविल्या जात आहे. पण चित्र वेगळे आहे. या विषयावर सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.**



राजस्थान उच्च न्यायालय विरुद्ध रजत यादव (19 डिसेंबर 2025) आणि युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण (6 जानेवारी 2026) या निर्णयांतील एक मूलभूत अट कायम ठेवण्यात आली आहे, ही बाब माध्यमांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जात आहे.

1) राजस्थान उच्च न्यायालय विरुद्ध रजत यादव (19 डिसेंबर 2025) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद 71 मध्ये स्पष्ट केले की त्या प्रकरणात आरक्षित प्रवर्गातील कोणत्याही उमेदवाराने इतर कोणतीही सवलत घेतली नाही. म्हणून त्यांची खुल्या प्रवर्गात निवड करण्यात यावी. याचा अर्थ असा की, जर कोणतीही सवलत घेतली असती तर खुल्या प्रवर्गात निवड झाली नसती. 2) युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण (6 जानेवारी 2026), या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने वरील तत्त्व अधिक ठामपणे अधोरेखित केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, मागासवर्गीय उमेदवाराने जर वय, प्रयत्न, फी किंवा इतर कोणतीही सवलत घेतली असेल, तर तो उमेदवार कितीही गुणवत्तावान असला, तरीही त्याची निवड खुल्या प्रवर्गात करता येणार नाही. या दोन्ही निर्णयांत मुळात काहीही बदल झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

**कारण :-** पूर्वीही सवलत घेतलेला उमेदवार खुल्या प्रवर्गात निवडल्या जात नव्हता आणि आजही तीच अट कायम आहे. हे निर्णय का येतात याचा विचार व्हावा. उत्तर आहे फार आधीपासून तसे शासकीय आदेश आहेत. त्याचा संदर्भ सुद्धा न्यायालयाने काही निर्णयात दिला आहे. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की फी, वय व प्रयत्न, सवलती मागासवर्गीय उमेदवारास स्पर्धेपर्यंत पोहोचण्याची संधी देण्यासाठी असतात. हीच भूमिका संविधान अनुच्छेद 335 मध्ये स्पष्टपणे नमूद आहे, जिथे प्रशासनातील कार्यक्षमता राखून सामाजिक न्याय साधण्याचा निर्देश आहे. शासकीय नियम व न्यायालयीन निर्णय यांनी सवलतींची अट कायम ठेवल्यामुळे मागासवर्गीय गुणवंत उमेदवारास कितपत लाभ मिळेल याचा विचार व्हावा. कारण अर्ज भरताना मागासवर्गीय विद्यार्थी उपलब्ध फी मधील सवलत घेतो. आजकाल ऑनलाइन अर्ज भरतात. जाती प्रवर्ग भरले तर सावलतीच्या फी चा रकाना पुढे येतो. त्याशिवाय अर्ज पुढे जात नाही. अशा तांत्रिक अडचणी निर्माण आहेत. ही सवलत घेतली म्हणून जर उमेदवाराने परीक्षेत इतर सर्वांपेक्षा जास्त गुण मिळवले असतील तर, त्याने पूर्वी घेतलेली फी, वय किंवा प्रयत्नांची सवलत त्याच्या गुणवत्तेच्या आड येऊ नये. ती अपात्रता ठरू नये. कारण त्याने दिलेली परीक्षा व खुल्या प्रवर्गात असलेल्या विद्यार्थ्यांने दिलेली परीक्षा सारखीच असते. प्रश्नपत्रिका व वेळ सारखीच असते. परीक्षक सारखेच असतात. गुण देण्यात तर काही सवलत नाही ना! म्हणूनच बुद्धिमत्तेचा आणि फी, वय आणि प्रयत्न याचा काही संबंध नाही. खुल्या प्रवर्गाचे विद्यार्थी सुद्धा अनेकदा प्रयत्न करीत असतात. सवलत घेतली असल्यास खुल्या प्रवर्गात निवड नाही. ही अट सरकारने धोरणात्मक पातळीवर रद्द करणे आवश्यक आहे. राजस्थान उच्च न्यायालयविरुद्ध रजत यादव आणि युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण हे निर्णय मागासवर्गीय गुणवंत उमेदवारांसाठी सकारात्मक असले, तरीही सवलतीची अट कायम ठेवल्याने खरा सामाजिक न्याय अजून पूर्ण झाला नाही. घटनात्मक उद्दिष्टे उतरवायची असतील तर गुणवत्तेला प्राधान्य देत सवलतींची अट रद्द केली पाहिजे. युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण निर्णयाचा न्यायालयीन प्रवास असा आहे की, 6 जानेवारी 2026 रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण हा निर्णय अचानक आलेला नसून, तो आरक्षणासंदर्भातील दीर्घकालीन न्यायालयीन विचार प्रक्रियेचा टप्पा आहे. या निर्णयामागे सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी दिलेल्या अनेक महत्त्वाच्या निकालांची स्पष्ट छाया दिसून येते.



**अनिल वैद्य**
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

**इंद्रा साहनी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (1992) :-** या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची घटनात्मक वैधता मान्य करताना, गुणवत्तेचा पूर्णतः त्याग होऊ नये हे मूलभूत तत्त्व मांडले. आरक्षण सामाजिक न्यायासाठी असले तरी, खुल्या प्रवर्गातील संधी नष्ट होता कामा नयेत, हा विचार येथे प्रथम ठळकपणे समोर आला.

**आर. के. सभरवाल विरुद्ध पंजाब राज्य (1995) :-** या निर्णयात न्यायालयाने पोस्ट-आधारित आरक्षण संकल्पना स्पष्ट केली. आरक्षित जागा भरल्यानंतर त्या पुढे खुल्या प्रवर्गात रूपांतरित होत नाहीत, हे तत्त्व येथे अधोरेखित झाले. युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण निर्णयातही आरक्षित उमेदवाराची गणना कोणत्या प्रवर्गात करायची, याच प्रश्नावर भर दिला आहे.

**जतींदर कुमार विरुद्ध हरियाणा राज्य (2008) :-** या प्रकरणात न्यायालयाने स्पष्ट केले की, आरक्षणातील सवलती (वय, प्रयत्न, फी) या गुणवत्तेपासून वेगळ्या मानता येणार नाहीत. सवलतींचा लाभ घेतलेला उमेदवार आणि कोणतीही सवलत न घेता स्पर्धा करणारा उमेदवार समान स्थितीत नाही, हा मुद्दा येथे मांडण्यात आला.

**दीपक सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य (2019) :-** या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आरक्षणाचा लाभ घेतलेला उमेदवार खुल्या प्रवर्गात समाविष्ट करता येणार नाही, जरी त्याने जास्त गुण मिळवले असले तरी. हा निर्णय युनियन ऑफ इंडिया विरुद्ध किरण प्रकरणाचा थेट पूर्वसंदर्भ मानला जातो.

क्रमशः ■ ■

---



# विकसित भारतासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्टेट सोशलीजम पूरक

आज आपण संपूर्ण देशात स्वतंत्र भारताचा व संविधान दिनाचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. ज्या स्वातंत्र्य चळवळीतील महापुरुषांनी तसेच घटनाकारांनी भविष्यातील आधुनिक व विकसित भारत कसा असेल याची ब्ल्यू प्रिंट संविधान निर्मितीच्या माध्यमातून देशातील जनता व राज्यकर्त्यांपुढे मांडून ठेवली आहे. या संविधानाचा वापर आज कसा होत आहे. लोकशाहीची मूल्ये राज्यकर्त्यांच्या अंमलबजावणीतून पायदळी तुडविली जात आहेत का? याचा विचार करण्याची वेळ आज आपल्यापुढे येऊन ठेपली आहे. निमित्य एवढेच आहे की आज 6 डिसेंबर. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करणे हे स्वतःला पहिला भारतीय व शेवटचा भारतीय समजणाऱ्यांना आवश्यक झाले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशात सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता आणण्यासाठी राज्य समाजवाद अभिप्रेत होता. त्यांच्या मते भारताचे संविधान या देशात लागू झाल्यानंतर राजकीय क्षेत्रात सर्वत्र समता असेल तर दुसरीकडे सामाजिक व आर्थिक क्षेत्रात असमानता असेल. अशा विरोधात्मक परिस्थितीत आपण टिकू शकणार का? हा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेडसावत होता. जर ही विषमतेची दरी कमी झाली नाही तर देशाच्या एकूण संपत्तीचे केंद्रीकरण होऊन हा देश भांडवलदारांच्या हातात पडेल. हा त्यांच्या द्रष्टेपणाचा इशाराच होता.

याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ‘स्टेट्स आणि मायनोरेटीज’ या पुस्तकाच्या माध्यमातून राज्य समाजवादाचा पुरस्कार केलेला आहे. संसदीय लोकशाही आणि राज्य समाजवाद यांच्यातील अंतर्विरोध जरी दिसत असला तरी त्यांचा योग्य मेळ घातल्यास त्या गोष्टी परस्परांना पूरक ठरू शकतात असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नेमके काय अपेक्षित होते, ते म्हणजे ज्यामध्ये राज्याने पायाभूत उद्योगांची मालकी स्वतःकडे घेऊन शेतकरी कामगारांचे शोषण थांबवावे आणि संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून शांततापूर्ण अंमलबजावणी करावी. राज्य समाजवादाच्या अनुषंगाने शेती ही राज्याचा उद्योग असावी, जमीनमालकी राज्याची असावी आणि जमीन मालक किंवा भूमिहीन मजूर नसावेत. सक्तीच्या संकलीकरणाऐवजी सामूहिक शेतीचे प्रयोग करावे. विमाक्षेत्र संपूर्ण राज्याच्या मालकीचे असावे. देशातील छोट्या छोट्या उद्योगाचे झपाट्याने औद्योगीकरण करावे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते.

हे मॉडेल व्यक्तिस्वातंत्र्य व समाजवादासाठी पूरक मानले जाते. ज्यामध्ये खाजगी क्षेत्र लघु उद्योगांसाठी ठेवले जाते पण सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी राज्य हस्तक्षेप आवश्यक असला पाहिजे. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन होऊन सामाजिक-आर्थिक समानता आणि जातिव्यवस्थेचा नाश होऊन समताधिष्ठित समाज निर्माण होण्यास मदत होईल. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कल्पना होती. परंतु आज आपण 2047 पर्यंत विकसित भारताचे स्वप्न बघितले आहे. भारतीयासाठी ही बाब अभिनंदनीय आहे. तेवढीच ती मृगजळ ठरते की काय असे वाटू लागले आहे. त्याचे कारण म्हणजे आज आपण अशा अर्थव्यवस्थेच्या दिशेने काम सुरु केले पाहिजे. जिथे भरमसाठ रोजगार निर्मिती होऊन गावांचा विकास व्हायला मदत होईल. आज ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रावर 65 ते 70 टक्के लोक निर्भर आहेत. तरीही आपल्या देशाच्या जीडीपी मध्ये त्यांचे योगदान केवळ 12टक्के एवढेच आहे. या तुलनेत उद्योग क्षेत्राचे योगदान 22 ते 24 टक्के आणि सेवा उद्योगाचे 52 ते 54टक्के एवढे आहे. आज जगात आपण आर्थिक महासत्तेच्या तुलनेत चवथ्या क्रमांकावर आहोत. पुढे ही यशस्वी वाटचाल करतांना आपण भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून या देशातील गोरगरीब, वंचित घटकाच्या उत्थानासाठी आर्थिक नियोजन करून त्यांना बरोबरीत घेतले पाहिजे. हा खरा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्य समाजवाद विचारांचा विजय असेल. या देशातील सर्व घटकांना सोबत घेऊनच आपण विकसित भारत या दिशेने मार्गक्रमण करू शकतो. परंतु राज्यकर्त्यांनी काही निवडक उद्योगपतींना हाताशी धरून खाजगीकरणावरुन निर्णय घेतला व देशाचे सार्वजनिक क्षेत्र त्यांच्या हवाली केले. त्यामुळे स्टेट सोशलिझम शक्य आहे का? हा प्रश्न उपस्थित होतो. केंद्र सरकारने काही प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे आदानी, अंबानी यांसारख्या खाजगी उद्योगांना संधी मिळाली आहे. हे खाजगीकरण स्टेट सोशलिझमच्या पारंपरिक अर्थाने म्हणजे राज्याच्या उत्पादन साधनांवरील पूर्ण नियंत्रणाच्या तत्त्वाशी सुसंगत नाही. परंतु, आधुनिक भारतात अर्थव्यवस्था मिश्रित स्वरूपाची आहे, ज्यात काही महत्त्वाच्या क्षेत्रात राज्याचे नियंत्रण असताना काही क्षेत्रांमध्ये खाजगी सहभाग आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांनी केलेले खाजगीकरण हे आर्थिक धोरणाचा मात्र एक भाग असू शकते. राज्यात स्टेट सोशलिझमची अंमलबजावणी हळूहळू, विशिष्ट महत्त्वाच्या उद्योगांची राज्य मालकी राखून, सामाजिक न्यायाच्या उपाययोजना आणि कल्याणकारी राज्य धोरणांद्वारे शक्य आहे. यामुळे पूरक सार्वजनिक-खाजगी भागीदारी(पी पी पी) पद्धत विकसित झाली, जी आर्थिक व सामाजिक दोन्ही ध्येयांसाठी उपयोगी ठरू पाहत आहे. तर एका बाजूला राज्यकर्त्यांचे खाजगीकरण धोरण चालू असूनही डॉ. बाबासाहेबांच्या राज्य समाजवादाच्या तत्त्वांची अंमलबजावणी विशिष्ट मर्यादांमध्ये, सामाजिक न्याय, समता आणि राष्ट्रीयकरणाच्या धोरणांद्वारे करता येणे शक्य झाले आहे. यासाठी देशातील सर्व पक्ष, सर्व जाती धर्म, नेतेमंडळी, कार्यकर्ते यांनी एकजूट होऊन देशाला विकसित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेले स्टेट सोशलिझम संविधानाच्या चौकटीत राहून कसे लागू करता येईल? हीच आजच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल. ■ ■



**रवींद्र दांडगे**
94045 45238

---

# अस्पृश्योन्नती व स्त्रियांची जबाबदारी



महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहात ब्राम्हण पंडितांनी डॉ. बाबासाहेबाना मारण्यासाठी गुंड सोडल्याचे कळताच चांभारांनी त्यांचा प्रतिकार केला. 27 डिसेंबर 1927 ला चांभारवाड्यातील परिषद आटोपल्यावर डॉ. बाबासाहेबांना जवळून पाहण्यासाठी दहा दहा मैल अंतरावरून स्त्रियां पायी आल्या. गर्दी झाली. डॉ. बाबासाहेबांना गुंडांनी मारहान केल्याचे ऐकून एक वृद्ध स्त्री मोठमोठ्याने रडायला लागली. डॉ. बाबासाहेबांना कळ्ले. म्हणाले, ‘माझ्या सुरक्षेसाठी माझे लोक सज्ज आहेत. काळजी करू नका.’ त्या वेळेस डॉ. बाबासाहेब स्त्रियांना उद्देशून म्हणाले, ‘घरप्रपंचाच्या अडचणी स्त्री-पुरुष मिळून सोडवता. त्याप्रमाणे समाजाच्या संसारातील अडचणी मिळून सोडवा. केवळ पुरुषांनी हे काम अंगावर घेतले तर पार पाडण्यास फार वेळ लागेल. स्त्रियांनी हे समजून घेऊन अंगावर घेतल्यास त्या कामात यश लवकर मिळेल. सामाजिक कामात पुरुषांसोबत स्त्रीयांचा सहभाग असावा. खरे पाहता अस्पृश्यता निवारणाची समस्या पुरुषांची नसून स्त्रियांची अधीक आहे. तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म देता. इतर लोक आम्हाला जनावरांपेक्षा नीच समजतात. आमच्या सावलीचाही विटाळ माणतात. इतरांना कोर्ट कचेऱ्यात यांना सन्मानाच्या जागा मिळतात. तुमच्या पोटी जन्मल्याने आम्हाला पोलिसही होता येत नाही. इतका आमचा हीन दर्जा. हे सर्व तुम्हाला ठाऊक असतांना आम्हाला तुम्ही जन्माला को घातले असा प्रश्न तुम्हाला कोणी केला तर तुम्ही काय उत्तर देऊ शकाल? ब्राम्हण व स्पृश्य स्त्रियांच्या पोटी जन्माला आलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्माला आलेल्या मुलात काय अंतर आहे? ब्राम्हण स्त्रियात जेवढे शील व पातिव्रत्य आहे तेवढे तुमच्यातही आहे. उलट तुमच्यात जितके मनोधैर्य, करारीपणा, धमक, काम करण्याची क्षमता, आहे तेवढी ब्राम्हण स्त्रियात नाही. असे असतांना ब्राम्हण स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक मानाचे व्हावे व तुमच्या पोटी जन्मलेले बालक अपमानाचे कां? तुमच्या पोटी जन्मला म्हणून त्याला साधा माणुसकीचा हक्क नसावा कां? अशा प्रश्नाचा तुम्ही कधीही विचार केला नाही. यावर तुम्ही विचार केला असता तर पुरुषांच्या आधी तुम्ही संघर्षाला उतरल्या असत्या. तुमच्या पोटी जन्म घेतला या पातकामुळे आम्ही अस्पृश्यतेची शिक्षा भोगतो. याचा विचार केला तर लागत असलेला हा कलंक धुवून टाकावा लागेल.’ डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांना अंतःकरणातून हाक दिली. म्हणाले, ‘हा कलंक धुवून काढण्यासाठी पुढे या किंवा आम्हाला जन्म देणे बंद करा. तुम्ही प्रतिज्ञा करा अशा अलंकीत अवस्थेत आम्ही जगणार नाही. समाजाच्या विकासासाठी पुरुषांनी जसा निश्चय केला तसा तम्हीही करा. दुसरे असे की तुम्ही जुन्या व गलिच्छ चालीरीतीचा त्याग करा. चालीरीतीवरून अस्पृश्यतेची ओळख होते. त्या चालीरीती आपल्यावर मुद्दाम लादल्या गेल्या आहेत. ज्यामुळे अस्पृश्यतेची ओळख होते ते सर्व टाळा. लुगडी नेसण्याची अस्पृश्यतेची पद्धत आहे ते बदला. वरिष्ठ समाजाच्या बाया नेसतात तसा प्रघात पाडा. गळ्यात भाराभर गळसऱ्या, हातात कोपरकर कथलाच्या, चांदिच्या गोठ-पाटल्या तुमची ओळख करतात. असे केल्याने तुमचे आयुष्य वाढत नाही किंवा त्याने शोभा वाढत नाही. उलट तुमचा तिरस्कार होतो. जमले तर दागिने सोन्याचे घाला. नाही जमले तर नका घालू. तुम्ही गृहलक्ष्मी आहात. स्वच्छतेने राहा. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे तुम्ही बंद केले याचा आनंद आहे. पण एखादा कोणी करत असल्यास ते बंद करण्याची जबाबदारी तुमची आहे. समाजात त्यावर बंदी करण्यास पुढे व्हा. याचे शिक्षण मुलींनाही द्या. जान व विद्या पुरुष व स्त्री दोघांसाठी समान आहे. जे पलटणीत गेले त्यानी हे ओळखले. खाण तशी माती, तशी पुढची पिढी दुरुस्त करण्याची जबाबदारी स्वीकारा. मी जे सांगितले त्यावर अंमल करा.’ डॉ. बाबासाहेब स्त्रियांशी पोटतिडकीने बोलले स्त्रियांवर त्याचा अपेक्षित परिणाम झाला. त्यांचा परिणाम पुरुषांवर ही झाला. त्यांनीही हातातील, कानातील रानटीपणा दर्शविणारे दागिने काढले. त्यांचा परिसरात परिणाम होऊन महाड म्युनिसिपिलिटीच्या झाडूवाल्यांनी सफाई कामाचा राजीनामा दिला. डॉ. बाबासाहेबानी स्त्रियांना त्यांची जबाबदारी सांगितल्यावर चांभार जातीच्या पंचांकडे वळ्ले. म्हणाले, ‘तुम्ही समाजाचे न्यायाधीश व धर्माधिकारी आहात. तुमच्यात मोठी योग्यता आहे. तुमच्या न्यायानुसार समाज वागणार. तुम्ही न्यायात खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करता हे कळ्ले. तसे करू नका. यामुळे समाजात अधर्म वाढेल. आपले कर्तव्य ओळखा. कर्तव्याची जाणीव ठेवा. जुन्या चालीरीती टाकून समाज मान्यतेच्या नव्या चालीरीती स्वीकारा. नव्या पद्धतीस अनुकूल न होणाऱ्यास वळणावर आणण्यासाठी बहिष्काराची मात्रा लागू करा. समाज घडवा. यामुळे अस्पृश्यता निवारण्याचे काम सुलभ होईल.’ डॉ. बाबासाहेबांना सर्व उपेक्षिताची कळ्कळ होती. सर्व समाजाला सन्मानाने जगता यावे अशी त्यांची धडपड होती. त्याच्या धर्मांतराच्या ठरावाचा आघात कामाठीपुऱ्यातील मुरळ्या, जोगतीणी, देवदासीवर झाला. देवतांना वाहिलेल्या स्त्री-पुरुषानी 16 जून 1936 ला पोयबावावाडीतील पण दामोदर हालमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या सभेचे आयोजन केले. प्रचंड गर्दी झाली. डॉ. बाबासाहेब म्हणाले, ‘तुम्ही देहविक्रय करणाऱ्यांनी महारांसोबत धर्मांतर करून चारित्र्य सुधारण्याची तयारी दर्शवली. तुमच्यामुळे अनुयायांची संख्या वाढेल म्हणून मला आनंद नाही. आम्ही समता, बंधुता स्वाभिमानाने उज्वल भविष्यासाठी धर्मांतरास तयार झालो. आमचे सोबत येण्यासाठी तुम्हाला दुर्गंधीत आयुष्य जगणे सोडावे लागेल. काया, वाचा, मनाची शुद्धी करून आमचे सोबत या. आम्ही स्त्री जात समाजाचा अलंकार मानतो. स्त्रियांच्या चारित्र्याचा सन्मान करतो. मुलाबाळांचा, कुटुंबाचा, कुळाचा नावलौकीक स्त्रियांच्या शरीरावर अवलंबून असते. देहविक्रयास उपजीविकेचे साधन मानू नका. तुम्ही त्यांचा त्याग केल्यास तुमच्या उपजीविकेच्या समाजमान्य साधनांची जबाबदारी मी घेतो. अनेक स्त्रिया गिरण्या, कारखान्यात मंजुरी करतात. प्रसंगी अर्धपोटी राहतात, पण तुमच्या धंद्यात जात नाही. इज्जतीने दुःखे सहन करा, पवित्र राहा.’ डॉ. बाबासाहेबांच्या स्फूर्तिदायक संशोधनाने स्त्रिया सद्गदीत झाल्या. दुर्गंधिची कामे सोडण्याचा सर्व स्त्रियांनी संकल्प केला. डॉ. बाबासाहेबांना अभिवचन दिले. सर्वांनी आपले जीवन उन्नत केले. ■ ■

**विद्या व्यासंग**



**प्रा. भाऊ वासनिक**
**मो. 9423606064**

---

# महाकारुणिक बुद्ध शिकवण



करूणा दुःखाशी लढण्याचे नव्हे, दुःखाशी जागरूकपणे बसण्याचे शास्त्र मानवजातीचा सगळ्यात जुना प्रश्न एकच आहे, दुःख आले, तर त्याचे काय करायचे? बहुतेक वेळा माणूस दुःखाशी झगडतो. कधी त्याला दाबतो. कधी त्याच्यावर चिडतो. कधी स्वतःलाच दोष देतो आणि कधी त्या दुःखाचा राग बाहेर फेकतो. भगवान गौतम बुद्ध मात्र या सगळ्या प्रवृत्तींच्या विरुद्ध उभे राहतात. ते दुःख नाकारत नाहीत, कारण ‘दुःखं अरियसच्चं’ दुःख हे सत्य आहे (संयुक्त निकाय 56.11, धम्मचक्रप्रवर्तन सुत्त). ते दुःखाला गोड शब्दांनी झाकत नाहीत. ते दुःखावर तत्त्वज्ञानाचा मुलामा चढवत नाहीत. ते एकच प्रश्न उभा करतात, दुःख पाहणारे चित्त नेमके कसे आहे? हा दृष्टिकोन म्हणजेच विपश्यना-कारण विपश्यना म्हणजे दुःख बदलण्याचा प्रयत्न नव्हे, तर ‘यथाभूतं पजानाति’ - दुःख जसे आहे तसे पाहण्याची क्षमता (मज्झिम निकाय 10, सतिपट्ठान सुत्त). याच प्रत्यक्ष पाहण्यातून करुणा विकसित होते. करुणा स्वतंत्र ग्रंथ नाही, पण धम्माचा केंद्रबिंदू आहे. ती एखादे एकटे प्रकरण नसून, बुद्धांनी वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या लोकांसमोर मनाच्या वेदनेवर दिलेला उपचार आहे. हा विचार अंगुत्तर निकाय, दीघ निकाय, मज्झिम निकाय आणि संयुत्त निकाय, या पाली ग्रंथांमध्ये विखुरलेल्या स्वरूपात आढळतो. विशेषतः ब्रम्हविहार शिक्षणात (दीर्घ निकाय 13, तेजोविज सुत्त; मज्झिम निकाय 99). श्रावस्ती, राजगृह, वैशाली येथे भिक्षूंना, गृहस्थांना, सामान्य दुःखी माणसाला भगवान बुद्धांनी हा विचार अनुभवाधारित भाषेत सांगितला, कारण दुःख कोणत्याही भाषेचे नसते आणि करुणा कोणत्याही काळापुरती मर्यादित नसते. बुद्धांची करुणा ही दया नाही. ती सहानुभूतीचा भावनिक ओघ नाही. ती चित्तशुद्धीची प्रक्रिया आहे. अभिधम्मात करुणेची व्याख्या अतिशय थेट दिली आहे, ‘दूःखी तेसु करुणा।’ (अभिधम्मसंगह) दुःखी अवस्थेत असलेल्या प्राण्यांविषयी मनात उत्पन्न होणारी जागरूक, अहिंसक प्रवृत्ती म्हणजे करुणा. इथे बुद्ध ‘दुसरा’ असा शब्द वापरत नाहीत. ते सत्ता-प्राणी-असा शब्द वापरतात. कारण दुःखी प्राणी सर्वात आधी आपणच असतो. माणूस इथेच चुकतो. आजचा माणूस स्वतःच्या दुःखाशी निर्दय असतो. तो स्वतःलाच दोष देतो. स्वतःच्या वेदनेला कमजोरी समजतो. ‘मीच असा आहे’, ‘माझ्यातच काहीतरी कमी आहे’ असे म्हणून स्वतःवरच मानसिक हिंसा करतो. विपश्यना इथे थांबवते. ती म्हणते पाहा, दोष देऊ नकोस. न्याय करू नकोस. (अनुपस्सी विहरति - मज्झिम निकाय 10) आणि करुणा पुढे येते. ती म्हणते, जखमेवर ओरखडू नकोस. जखमेवर प्रेमाने हात ठेव. हीच स्वतःवरची करुणा आहे. करुणा म्हणजे रडवेले मन नाही. करुणा म्हणजे सहानुभूतीचा दिखावा नाही. करुणा म्हणजे जागरूक मनाची स्थिरता आहे. म्हणूनच बुद्ध सांगतात, ‘करुणासहगतं चित्तं भावेति।’(अंगुत्तर निकाय 4.125) जो करुणेने युक्त असे चित्त विकसित करतो, त्याचे चित्त शुद्ध होते. विपश्यना दुःख पाहते. करुणा दुःखाला सुरक्षित जागा देते. विपश्यना नसेल, तर करुणा भावनिक बनेल. करुणा नसेल, तर विपश्यना कोरडी बनेल. दोन्ही एकत्र आल्यावरच चित्तं विसुझति-मन न मोडता शुद्ध होते. दुःख आले तरी स्वतःला तोडायचे नाही. अपमान झाला तरी मन पेटवायचे नाही. राग आला तरी हात उचलायचा नाही. ही केवळ नैतिक शिकवण नाही, हा मनाचा नैसर्गिक परिणाम आहे. कारण करुणा नसलेले दुःख हळूहळू राग बनते (दोश), राग कृती बनतो (कम्म), आणि कृती हिंसा बनते (संयुक्त निकाय 12). म्हणजे समस्या दुःखात नाही. समस्या दुःखाशी अविज्ञानातून वागण्यात आहे (अविजा पच्चया संखारा - संयुक्त निकाय 12.1). म्हणून बुद्ध करुणेला एकटे सोडत नाहीत. ते तिला ब्रम्हविहारांच्या चौकटीत ठेवतात, ‘मेत्ता-करुणा-मुदिता-उपेक्षा चत्तारो ब्रम्हविहारा।’ (दीर्घ निकाय 13) ही चौकट नसेल, तर करुणा ओझे बनते. या चौकटीत करुणा उपचार बनते. आज मानसिक ताण वाढतोय. चिडचिड सामान्य झाली आहे. द्वेष सहज व्यक्त होतो. हिंसा ‘expression’ बनली आहे. बुद्ध इथे थांबवतात. ते म्हणतात, दुःख लपवू नकोस. पण दुःखावर रागही करू नकोस. त्याच्याशी जागरूकपणे, करुणेने बस. म्हणून करुणा आज मानसिक उपचार आहे, सामाजिक औषध आहे आणि माणूसपणाची शेवटची आशा आहे. बुद्ध कुठेही असे म्हणत नाहीत की दुःख येऊ नये. ते म्हणतात, दुःख आले, तर त्याच्याशी कसे वागायचे ते शिका. जर प्रत्येक माणूस स्वतःशी करुणावान झाला, तर हात उचललेच जाणार नाहीत. म्हणून करुणा समजून घेणे श्रद्धा नाही ती विपश्यनेतून तपासलेली आजच्या काळाची अपरिहार्य गरज आहे. ■ ■



**नितीन प्रल्हाद अंभोरे**
**मो. 8956107061**

# विनम्र अभिवादन

## ‘जयभीम’ चे जनक - बाबू हरदास



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निष्ठावंत सैनिक बाबू हरदास यांचा जन्म 6 जानेवारी 1904 रोजी सिंगोरी (नागपूर) येथे झाला.

1920 : विवाह.
1921 : वडिलांचे निधन.
1921 : महाराष्ट्र साप्ताहिकाची सुरुवात; रात्रकालीन पाठशाळा सुरू.
1922 : महार समाज संघाची स्थापना.
1923 : महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनास विरोध.
1927 : रामटेक येथे अस्पृश्यांसाठी मंदिर उभारणी; विहिरींचे बांधकाम.
1928 : सामाजिक जागृतीसाठी कविता लेखन; वीर बालक नाटकाद्वारे जनजागृती.
8 ऑगस्ट 1930 : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस अधिवेशनाचे आयोजन.
1931 : ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच अस्पृश्यांचे खरे नेते आहेत’ या आशयाचे 32 टेलिग्राम लंडन येथील गोलमेज परिषदेस पाठविले.
8 मे 1932 : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कामठी येथे ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेसचे दुसरे अधिवेशन.
1933 : एकुलत्या एक पुत्राचे निधन.
6 जानेवारी 1935 : समता सैनिक दलाच्या पत्रामध्ये ‘जयभीम’ या शब्दाचा पहिल्यांदा उच्चार.
16 फेब्रुवारी 1937 : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षातून मध्य प्रांतातून आमदार म्हणून निवड.
12 जानेवारी 1939 : अवघ्या 35 व्या वर्षी कामठी येथे परिनिर्वाण.

अशा या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्पित शिपायास - ‘जयभीम’चे जनक बाबू हरदास यांना त्यांच्या 87 व्या स्मृती दिनानिमित्त विनम्र आदरांजली!!

बहुजन सौरभ

# राजकीय विचार करा नुकसान टाळा

सामाजिक प्रश्नांवर प्रभावी लढा उभा राहिला नाही. आरक्षण, शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय, अत्याचारविरोधी लढे एकत्रितपणे प्रभावीपणे मांडता आले नाहीत. आंबेडकरी समाजाने काय गमावले व का गमावले, कारण एकच, ऐक्याचा अभाव!

**आंबेडकरी विचारधारेच्या राजकीय पक्षांचे एकत्रीकरण न झाल्याने समाजाचे झालेले नुकसान मतांचे विभाजन (Vote Split). आंबेडकरवादी विचारधारेचे मतदार वेगवेगळ्या पक्षांत विभागले गेले. परिणामी बहुसंख्य मत असूनही प्रतिनिधित्व कमी झाले आणि सत्तेपासून समाज दूर राहिला. राजकीय ताकद कमी झाली. एकत्रित ताकद नसल्यामुळे शासन व सत्ताधाऱ्यांवर दबाव निर्माण करता आला नाही. समाजाच्या प्रश्नांना दुय्यम स्थान मिळाले, नेतृत्वावर अविश्वास निर्माण झाला, पक्षांतर्गत मतभेद, आरोप-प्रत्यारोप यामुळे समाजात संभ्रम निर्माण झाला आणि राजकारणाबद्दल निराशा वाढली, नीतीमूल्यांचा ऱ्हास, व्यक्तिकेंद्रित राजकारण वाढले. विचारधारा बाजूला पडून पद, चिन्ह व अहंकार महत्त्वाचा ठरला, तरुण पिढी राजकारणापासून दूर गेली, एकत्रित दिशा नसल्यामुळे तरुणांमध्ये राजकीय उदासीनता वाढली आणि चळवळीची ऊर्जा कमी झाली.**

बंधु-भगिनींनो, आज प्रश्न कठोर आहे. पण सत्य लपवून चालणार नाही. आपण डॉ. बाबासाहेबांचे नाव घेतो, पण त्यांच्या विचारांवर चालतो का? आपण एकत्र आलो नाही आणि अन्याय होत राहिला! महाबोधी विहार, बौद्धगया, आजही बौद्धांच्या पूर्ण ताब्यात नाही. सरकार टाळाटाळ करते, तरीही आपण एकत्र आलो नाही!

दीक्षाभूमी - अपमानाची कासवगती, सौंदर्यीकरण रखडले आहे. परिसरातील जमीन स्मारक समितीला दिली जात नाही. तरीही आपण एकत्र आलो नाही!

SC उपवर्गीकरण - समाज फोडण्याचा डाव अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचे कारस्थान सुरू आहे. तरीही आपण एकत्र आलो नाही!

**पटवर्धन मैदान - फसवी घोषणा :-** 1991 मध्ये आंबेडकर स्मारक जाहीर. 35 वर्षे उलटली, स्मारक नाही! तरीही आपण एकत्र आलो नाही!



**नरेश साखरे**
**मो. 9923086515**



बहुजन सौरभ

**अंबाझरी हक्काचे आंबेडकर भवन :-** समाजाचे भवन पाडले. बिल्डरच्या घशात घातले. तरीही आपण एकत्र आलो नाही!

**नारी - 130 एकर आंबेडकर पार्क :-** 2002 मध्ये घोषित. सरकार नाकर्ते ठरले, न्यायालयाने आरक्षण रद्द केले. तरीही आपण एकत्र आलो नाही! श्याम हॉटेल - डॉ. बाबासाहेबांचे स्मृतीस्थळ, राष्ट्रीय स्मारक घोषित होऊनही सरकारने दुर्लक्ष केले. तरीही आपण एकत्र आलो नाही!

नागपूर महानगरपालिका 35 वर्षांत एकही आंबेडकरी महापौर नाही! तरीही आपण एकत्र आलो नाही! हे सगळे का घडले? कारण स्पष्ट आहे, स्वार्थी राजकीय नेत्यांनी समाजात फूट पाडली आणि आपण ती फूट सहन करत राहिलो.

आता बस्स - फार झाले! आता नेत्यांची वाट पाहायची नाही. आता समाजानेच पुढे यायचे आहे. एकत्र या!

प्रश्नांवर एकत्र उभे राहा! स्वार्थी नेत्यांना धडा शिकवा! ऐक्य म्हणजे काय?

ऐक्य म्हणजे, सगळे एका पक्षात जाणे नाही. ऐक्य म्हणजे, एकमेकांविरुद्ध द्वेष न करणे, एकमेकांना शत्रू न मानणे, समाजाच्या प्रश्नांवर एकत्र लढणे, आपली लढाई एकमेकांशी नाही. आपली लढाई आहे अन्यायाशी! विषमतेशी! बहिष्काराशी! आज निर्णयाचा क्षण आहे! आपण फक्त इतिहासाचे प्रेक्षक राहणार आहोत का? की इतिहास घडवणार आहोत? भांडणाने आपण बरेच गमावले आहे. आता एकतेशिवाय पर्याय नाही! या निवडणुकीत ठाम निर्धार करा! डॉ. बाबासाहेबांच्या नावावर नव्हे, त्यांच्या विचारांवर मतदान करा! वेगवेगळे पक्ष असू देत, पण समाजासाठी दिशा एकच ठेवा! फक्त आंबेडकरी विचारधारेच्या राष्ट्रीय पक्षातील उमेदवारालाच मतदान करा! ■ ■

# समाजाचे पारध करणारी वृत्तपत्र!




बहुजन सौरभ

मागील काही वर्षांचा वृत्तपत्रिय आढावा घेतला असता असे लक्षात येते की, काही संपादकासह वृत्तपत्राचे चरित्र आणि चारित्र्य हे दोन्ही वृत्तपत्र सृष्टीला साजेसे आहेत की नाही? हा चर्चेचा आणि गंभीर विषय आहे. कारण आजची प्रचार-प्रसार माध्यमांची (अपवाद वगळता) बेगडी भूमिका जनतेच्या शोधक नजरेत कैद झाली आहे. काहींचे कार्य मात्र त्याला अपवादच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणाऱ्या वृत्तपत्र जगताला अनुरूप असून, ते समाजाचे पारध (टेहळणी) करणारी आहेत. पत्रकारिता तथा मीडिया क्षेत्रातील काहींचा हा क्रांतीप्रवास आज अविरत सुरू आहे. तसेच त्यांची ठेवणही महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वाला साजेशी व एकरूप आहे. पुरोगमित्वाच्या झालरीमुळे ते समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या संविधानिक तथा महान मानवी मूल्यांना प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्याकडे तळवेचाटू तथा चाटूगिरीला अजिबात वाव दिसून येत नाही. कारण आज अनेकांना तशी वाळवी लागल्याचे बोलले जाते. कित्येकांनी स्वतःला विविध पक्ष-संघटनांच्या खुंट्याला बांधून घेतले, तर काही त्यांचीच बपौती असल्यामुळे आपल्या स्वार्थापोटी आणि भल्यासाठी देशाचे भवितव्यही ते वेशीला टांगायला मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे त्यांना लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणावा की नाही? हाही प्रश्न निर्माण झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लोक, विचार तथा प्रचार-प्रसार माध्यमाच्या रूपान समाजाचे पारध करणारी यंत्रणा अपेक्षित होती. जेणेकरून समाजाचे संरक्षण होईल. मग ते कोणी करावे? कशासाठी करावे? व का करावे? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. इतिहासाचा आढावा घेतला असता समाजावर अनेकविध अन्याय-अत्याचार झाल्याचे दिसून येतात. ते सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तथा राजकीय आणि आणखीही वेगवेगळ्या रूपाने असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एक वेळ तर अशी होती, की बहुजन समाजाला नैसर्गिक हक्क अधिकारही नाकारण्यात आले होते. त्यांच्या स्पर्शाचाच नव्हे तर सावलीचाही विटाळ होत होता. त्यांचे वर्णन वामनदादांनी आपल्या एका कवितेच्या ओळींमध्ये केलेले दिसून येते, ते म्हणतात,

*‘गावामधलं शिळ खरकटं आणीत होती आजी।*
*नव्हती राजी तुझ्या कुडीला ताजी भाकर भाजी।*
*अंग झाकाया मुडद्यावरचे आणीत होते कपडे।*
*तरी बिचारे अंग तयाचे अर्धेनिर्धे उघडे।*

याचा अर्थ असा की, इथल्या मनुवादी, विषमतावादी, ब्राह्मण्यवादी, तसेच वर्णवर्चस्ववादी व जातीयवादी व्यवस्थेने एका विशिष्ट गटाला ज्यांना आम्ही आज बहुजन समाज (एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी) असे संबोधतो त्यांच्यामध्ये क्रमिक असमानता निर्माण करून त्यांना कमी-अधिक प्रमाणात हक्क अधिकारांपासून वंचित ठेवले. जेणेकरून त्यांच्यामध्ये संघटन निर्माण होऊ नये. तसे झाले तर ते बंड करतील व आपण अल्पसंख्यांक ठरून त्यांच्यासमोर आपला टिकाव लागणार नाही. बहुजन समाजापैकी शूद्रांसाठी मनुस्मृतीचे नियम होते. जसे की,

**‘शक्तीनापेन-शुद्रोही नकार्य धनसंचयः**
**शिद्रोही धनमासाध्य ब्राम्हणेनः बाध्यते।’**

(अध्याय 10 श्लोक क्र. 129)

वरील श्लोकाचा अर्थ ढोबळमानाने असा सांगता येईल की, शूद्राकडे धनाचा आणि ज्ञानाचा संचय होता कामा नये, असे झाल्यास ते ब्राम्हण्याला बाधक ठरते. परंतु अतिशूद्र म्हणजेच अस्पृश्य (स्पर्श करण्यास अयोग्य) समूहाने तर शिक्षण घेऊ नये, नवीन कपडे परिधान करू नये, ताजे अन्न खाऊ नये, तांब्या पितळीची भांडी वापरू नये, पंचांच्या पंक्तीत चपातीचे भोजन वाढू नये, नवरदेवाला घोड्यावर बसवू नये, संपत्तीचा संग्रह करू नये असे एक ना अनेक ग्रामभट सांगतील तेच नियम होते.

या सर्वांचे समाजातून उच्चाटन होऊन मानवाचे उत्थान होण्यासाठी संत महापुरुषांनी वर्षानुवर्ष खस्ता खाल्ल्या. त्याग, कष्ट, समर्पण दिले. मानवी साधन संसाधनांसह प्रचार-प्रसार माध्यम उभी केली.



**भिमराव परघरमोल**
**9604056104**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर मुखपत्र नसणाऱ्या एखाद्या सभा, संघटनेची तुलना ही पंख नसलेल्या पक्षांसोबत केलेली आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या हयातीत एकच नवे तर, तब्बल चार-चार वृत्तपत्र सुरू केली. ती सर्व व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने म्हणजेच मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होती. त्यांचे पहिले वृत्तपत्र नावाप्रमाणेच पिढीजात मुक्यांचे प्रतिनिधित्व करणारे ‘मूकनायक’ असे होते. त्याची पहिली जाहिरात टिळकांच्या केसरीने पैसे घेऊनही प्रकाशित करण्यास नाकारली होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची काही वृत्तपत्र साधन संसाधनांऐवजी बंद पडली. परंतु त्यांनी थोडीही कच खाल्ली नाही. वृत्तपत्र कुणाच्याही दावणीला बांधली नाहीत. आज त्यांच्या सर्व वृत्तपत्रांचे वृत्तांकन हे महाराष्ट्र शासनाने खंडरूपाने प्रकाशित केल्यामुळे त्यातील आदर्शता समाजासह संपूर्ण विश्वातील वृत्तपत्रीय जगताला प्रेरणा तथा दिशादर्शक ठरत आहे. आज घडीला काही माध्यमे त्याच वाटेवरील वाटसरू भासत आहेत. काही संपादकांचे व्यक्तिमत्व चळवळीसाठी सर्वांगाने ओतप्रोत आहे. सुरू झालेला त्यांचा प्रवास आज महाराष्ट्र भूमी कवेत घेऊ पाहते आहे. समाजप्रबोधनाच्या अनेक मार्गांपैकी वृत्तपत्रांच्या माध्यमातून ते समाज प्रबोधन करण्यासाठी सदैव तत्पर असतात. फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीला त्यांच्या कार्यात अग्रस्थान देतात. ते सर्व सांभाळून क्रांतीचा प्रवास हा अविरत व अश्वगतीने सुरू ठेवतात. कोणताही व्यक्ती किंवा वृत्तपत्र स्वतःला चळवळीचे वाहक म्हणून घेत असेल, तर त्याच्या ठाई नीतिमत्ता, प्रामाणिकता आणि मानवी मूल्यांना प्राधान्य हे प्राधान्यक्रमानेच असावे लागते. ते त्यांच्या वर्तनातून प्रतीत होऊन व्यक्तित्वात ओसंडून वाहताना दिसले पाहिजे. चळवळीच्या रथाची आगेकूच करण्यामध्ये प्रचार-प्रसार माध्यमांचा सर्वात मोठा वाटा असल्याचा इतिहास साक्ष देतो. कारण ते समाजाचे निःस्वार्थ पारध करत असतात. परंतु आज त्या रथाची वाटचाल धीमी होताना दिसत आहे. त्याची चाके निखळतात की काय? असा भास होताना दिसतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नानकचंद रत्तूला एके ठिकाणी म्हणतात की, ‘हा प्रगतीचा रथ समाजाला पुढे नेता आला नाही तरी चालेल. परंतु तो मागे जाता कामा नये.’ आज सर्वात जास्त ती जबाबदारी चळवळीला पोषक असणाऱ्या वृत्तपत्रांची आहे. आज देशापुढे अनेक समस्या ‘आ’ वासून उभ्या असून अनेक क्षेत्रांतील प्रगतीचा आलेख उलटा प्रवास करताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय सर्वेमधील अनेक राष्ट्रांच्या तालिकेतील भारताचा क्रमांक शरमेने मान खाली घालावी असाच आहे. महागाईचा दर, सांप्रदायिकता, वाढती बेरोजगारी, त्यामुळे नैराश्याला सामोरे जाऊन व्यसनाधीन होणारी तरुणाई यावर चर्चा होऊन जबाबदारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना कित्येकांच्या लेखणीतील शाही संपून हाता-तोंडाला लखवा मारला की काय? अशी शंका येण्यास वाव आहे. परंतु अपवादांसह काही वृत्तपत्र आपली संविधानिक जबाबदारी लोकशाहीला पोषक असणाऱ्या दिशेने पार पाडताना दिसत आहे. ती जबाबदारी काहींचीच नसून सर्वांचीच आहे. म्हणून ती त्यांनी अविरत पार पाडावी अशी भारतीय जनतेची अपेक्षा आहे. समाजाचे निःस्वार्थ पारध करण्यास त्यांच्या लेखणीतील बळ दिवसेंदिवस वाढत जावो व महापुरुषांच्या स्वप्नातील आणि समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या महान मानवी तथा संविधानिक मूल्यांवर आधारित भारत आकार घेण्यास त्यांचा सदैव हातभार लागो हीच एका लेखकाच्या लेखणीचीही अपेक्षा...... ■ ■

# शाहू-फुले-आंबेडकरांचे आम्हीच खरे वारसदार



बहुजन सौरभ

विदर्भात अनेक घरांमध्ये महालक्ष्मी बसतात. कुठे दोन दिवसासाठी तर कुठे अडीच दिवसासाठी महालक्ष्मी असते. कार्यक्रम झाला की सर्व महालक्ष्म्या एकत्र बांधून वरती कुठेतरी अडगळीत ठेवून देतात. नंतर परत पुढच्या वर्षी सणावर महालक्ष्म्या बाहेर काढतात. त्यांना स्वच्छ करून पूजा-अर्चा केली जाते. निवडणुकांमध्ये पण काही नेत्यांचे तसेच दिसत आहे. एरवी शिव्या देणारे फुले-शाहु-आंबेडकरांचा विचार भोंग्यात सांगत आहे. निवडणुका जवळ आल्या की अर्जंटमध्ये विचाराला धार येते. तिची पूजा होते. आरती होते. भोंगे लावून मिरवणूका काढल्या जातात. शेवटी महाप्रसाद पण असतो. दोन दिवसाअगोदर एका उमेदवाराची मुलाखत घेण्यासाठी गेलो होतो. साहेबांचा एकदम व्यस्त कार्यक्रम होता. फोनाफानी सुरू होती. महालात एक सभा लावू, पारडीत गरज नाही, बांग्लादेशला दोन सभा लावा लागेल, असे फोनवर कोणाला तरी सांगत होते. आम्ही ऐकत होतो. विषय बॅनरचा पण निघाला. ‘बाबासाहेब आणि महात्मा फुले यांचा फोटो लावला नं? अरे, उस इलाके में वो लोग ज्यादा रहते, बॅनर में बडा साईज में डॉ. बाबासाहाब का फोटो लगाना पडेगा!’ असे त्यांनी बजावून सांगितले. आता प्रचाराच्या पद्धती बदलल्या आहे. सोशल मिडिया, इव्हेंट मॅनेजमेंट, इलेक्शन कॅम्पनिंग, पीआर टीम ट्रेंडिंगवर आहे. मात्र गाडीवर भोंगा लावून लोकांना त्रास देण्याची प्रथा सुरूच आहे. ई-रिक्षावरील भोंगा सतत बोंबलत असतो. ‘तुमच्या-आमच्या सर्वांच्या विकासासाठी वार्ड क्र. 17 चे आपल्या हक्काचे तडफदार युवा उमेदवार. यांना प्रचंड बहुमताने विजयी करा’ असे कडक आवाजात बोलून शेवटी ‘विजयी भव’ हे गाणे दिवसभर ऐकायला मिळते. शिट्टी, टोपली, बॅट, टीव्ही, कपाट, पर्स, चमचा, वाटी, मच्छरदाणी, गाई, म्हस, कुत्रे, रानडुक्कर, बुंदीचे लाडू असे चिन्ह पण गाण्यात सांगत आहे. जवळपास सगळ्याच उमेदवारांचे सेम कंटेंट आहे. ‘शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा चालवणारे, संविधानाचे खंदे समर्थक, बहुजनांचा आवाज, चळवळीतील नेता, दमदार नेतृत्व’ असे शब्द भोंग्यातून कानावर पडत आहे. विशेष म्हणजे, सर्वच पक्षांच्या उमेदवारांनी फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा उधार घेतलेला दिसत आहे. सगळ्यांनाच फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा पुळका आला आहे. डॉ. बाबासाहेबांचा विजय असो! शिवाजी महाराज की जय! भाषणांमध्ये जोर जोरात नारे सुरू आहे. सर्वच महापुरूषांची नावे विशेषणांनी सजली आहे. कार्यक्रमात महापुरूषांच्या फोटोंची गर्दी झाली आहे. उमेदवार आपल्या पक्षाचा दुपट्टा घालून सर्व फोटोंची पूजा करतो. साष्टांग दंडवत घालतो. पूजा झाल्यावर परत एक जोरदार नाराज भाषणाची सुरूवात पण महापुरूषांना अभिवादन करूनच होते. सत्य, निष्ठा, प्रामाणिक, कर्तृत्व, एकात्मता, सेवा, समाज, संविधान अशा मसालेदार शब्दांची थाळी श्रोत्यांसमोर वाढली जाते. श्रोतांना म्हणजेच मतदारांना पण ही थाळी पचते. ढेकर पण देत नाही. म्हणूनच देशभर अशा थाळींच्या पंगती किंबहुना महाप्रसाद सुरू आहे. मला तर वाटते आपल्या पुढाऱ्यांनाच महापुरूषांच्या विचारांचे ब्रॅण्ड अम्बेसिडर घोषित करावं. इलेक्शन महाराज की जय हो! ■ ■

वांध्याची कलम



**गौरव मानकर**
**मो.9767630753**

## ईच्छापात्र

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

असं म्हणतात की, मन हे असे ईच्छापात्र आहे जे कधीही भरत नाही.

‘साँसों की गिनती निश्चित है, ईच्छाओं का, अंत नहीं है, जिसकी कोई ईच्छा ना हो, अब ऐसा कोई संत नहीं है ‘ पण कधीकधी आयुष्यात अशीही वेळ येते की जी गोष्ट आपल्याला खूप हवीहवीशी वाटते ती गोष्ट जेव्हा नकोशी होते तेव्हा कळते की काळामध्ये किती सामर्थ्य आहे. वास्तविक पाहता स्वातंत्र्य प्रत्येकालाच हवे असते पण जिवनात काही प्रसंग असे घडतात ज्यामुळे प्रबळता आणि हतबलता ह्याचा अनुभव येताच मनात ही भावना निर्माण होते की, ‘ उजड़ी हुई दुनिया को, तू आबाद ना कर, बीते हुए लम्हों को, तू याद ना कर, एक पिंजरे में क़ैद पंछी ने , ये कहा हमसे, मैं भूल चुका हूँ उड़ना , मुझे आज़ाद ना कर. ■ ■

## मनोबल

एखाद्या व्यक्तीचे मनोबल वाढवण्यासाठी त्याचे समर्थक त्याला सल्ला देतात की,‘ मुश्किलों में मुस्कुराना सीखिए , फूल बंजर में, उगाना सीखिए ‘ पण ही कृती वाटते तेवढी सोपी आहे का ? तर ह्याचे उत्तर नाही असेच येईल. पण हे अशक्य देखील नाही. कारण कोणतीही बाग फुलवायला वातावरण पोषक असायला हवे जर पाऊस पडत नसेल तर आभाळाला कोणी निवेदन देत नाही . तो जेव्हा पडायचा तेव्हाच पडतो. त्यासाठी योग्य वेळेची प्रतीक्षा करावी लागते. आयुष्याच्या चढउतारात काही माणसे जवळ येतात तर काही दुरावतात. जवळची व्यक्ती दूर गेली की मनाला यातना ह्या होणारच. ‘ खुदा से जब पूछा, की क़ीमत क्या है प्यार की, खुदा हँसकर बोला, ऑसु भरी निगाहें, और एक उम्र इंतज़ार की’ तर विषय कोणताही असो प्रतीक्षा तर करावीच लागते. ज्यावेळी प्रतीक्षा करूनही मनासारखा जोडीदार मिळत नाही तेव्हा मात्र एकचं मार्ग उरतो . ‘ खुश रहना है तो , अपनी फितरत में, एक बात शुमार कर लो, ना मिले कोई अपने जैसा, तो खुद से ही प्यार कर लो ‘पण माणूस हा आशावादी प्राणी आहे. आणि जिवन हे आशेवरच चालते . मनाची अशी अवस्था झाली तर प्रयत्नवादी व्यक्ती आपल्या मनाला सांगतात की,‘ घूमता हूँ दर बदर मगर, आवारा नहीं हूँ मैं, हालात का मारा हूँ, पर बेचारा नहीं हूँ मैं, हंस मत ए जन्दिगी, मुझे गिरता हुआ देख कर, फिर भी संभल जाऊँगा, अभी हारा नहीं हूँ मैं ‘ ■ ■

बहुजन सौरभ

# लठ्ठपणा (ओबेसिटी)



बहुजन सौरभ

स्थूलता लठ्ठपणा हा एक जीवनशैलीजन्य आजार आहे. आज समाजामध्ये लठ्ठपणा हा एक आरोग्यासमोरील खूप मोठी समस्या म्हणून उभा आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये सर्वांनाच भेडसावणारी समस्या म्हणजे लठ्ठपणा होय. लठ्ठपणा आता ही वैयक्तिक समस्या राहिली नसून तो समाजाच्या आरोग्याचा प्रश्न झाला आहे. समाजापुढे सर्वात मोठे आरोग्य विषयक आव्हान म्हणजे लठ्ठपणा होय. लठ्ठपणाचे प्रमाण दिवसेंदिवस शहरी तसेच ग्रामीण भागातही झपाट्याने वाढत आहे आणि याचे प्रमुख कारण म्हणजे आजच्या काळातील बदललेली जीवनशैली होय.

लठ्ठपणा हा लहान मुले तरुण व महिला यामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. लठ्ठपणा म्हणजे शरीरात आवश्यकतेपेक्षा अधिक चरबी जमा होणे हा आजार हळूहळू वाढतो. त्यामुळे सुरुवातीला याकडे बरेच वेळा दुर्लक्ष केल्या जाते. लठ्ठपणा हा फक्त सौंदर्याचा प्रश्न नसून तो अनेक गंभीर आजाराचे एक कारण होत आहे. जेव्हा शरीराचे वजन उंचीच्या तुलनेत जास्त वाढते तेव्हा तो व्यक्ती लठ्ठ आहे असे संबोधल्या जाते किंवा यालाच आपण लठ्ठपणा असे म्हणतो.

**लठ्ठपणाची लक्षणे :-** वजन खूप वाढणे, थोडे चालले तरी दम लागणे, सतत थकवा जाणवणे, गुडघे, कंबर दुखी व सांधेदुखी, झोपेत घोरणे व नीट झोप न लागणे, आत्मविश्वास कमी होणे, जास्त घाम येणे, डिप्रेशन व Anxiety सामाजिक मानसिक तणाव.

**लठ्ठपणाची कारणे :-** अति प्रमाणात जंक फूड, फास्ट फूड, तेलकट व गोड पदार्थांचे सेवन, शारीरिक हालचालीचा अभाव, व्यायाम न करणे, मोबाईल टीव्ही व कम्प्युटर याचा अतिवापर, अनियमित जेवण, ताणतणाव, अपुरी झोप, अनुवंशिक कारणे, हार्मोनल imbalance eg. Thyroid PCOD.

**लठ्ठपणामुळे होणारे दुष्परिणाम :-** मधुमेह (डायबिटीस), उच्च रक्तदाब (Hypertension), हृदयविकार (Heart diseases), फॅटी लिव्हर, संधिवात (Arthritis), महिलांमध्ये मासिक पाळीचे विकार.

**लठ्ठपणावरील उपाय व प्रतिबंध :-** संतुलित व पोषक आहार रोज किमान 30 ते 45 मिनिट चालणे नियमित योगासन व व्यायाम करणे जंक फूड टाळणे, अति गोड तेलकट व बेकरीचे पदार्थ यांचे सेवन टाळणे वेळेवर योग्य प्रमाणात संतुलित आहार घेणे. पुरेशी व शांत झोप घेणे, तान तणाव कमी करणे.

**उपचार :-** डॉक्टरांच्या सल्ल्याने आहार तज्ज्ञांकडून डायट प्लान बनवून घेणे, नियमित वजन व आरोग्य तपासणी करणे, रक्ताच्या व हार्मोनल चेकअप करणे, डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घेणे. लठ्ठपणा हा आजार असला तरी योग्य जीवनशैली आहार व व्यायामाच्या मदतीने आपण तो नियंत्रित करू शकतो. शेवटी असाच म्हणेल की, ‘प्रिकॉशन इज बेटर दॅन क्युअर’.

‘स्वस्थ रहा मस्त रहा.’ ■ ■

आरोग्यम् सुखसंपदा



**डॉ. सूर्यकांता कांबळे**
**मो. 9923338047**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेत दिलेले भाषण अत्यंत जगप्रसिद्ध आहे. त्या भाषणात त्यांनी ‘अराजकतेचे व्याकरण’ (Grammar of Anarchy) या संकल्पनेद्वारे स्वतंत्र भारतासमोरील भविष्यातील धोक्यांची स्पष्ट जाणीव करून दिली. त्यांनी देशाला स्वातंत्र्याबद्दल शुभेच्छा दिल्या, मात्र त्याच वेळी काही गंभीर इशारेही दिले.**

# भारतीय राजकारणातील गोंधळ !

डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी ते टिकवणे हे भारतीयांसमोरील मोठे आव्हान असेल. भारतीय जनता लोकशाही, संविधान आणि त्यातील मूल्ये जपेल की नाही, याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली होती. भारत हे एक प्रगल्भ लोकशाही राष्ट्र म्हणून उभे राहावे, यासाठी त्यांनी या देशाला संविधान दिले; मात्र त्या संविधानानुसार कारभार करणारी प्रामाणिक आणि मूल्यनिष्ठ माणसे मिळाली नाहीत, तर कितीही उत्तम संविधान असले तरी ते अपयशी ठरेल, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. आज मागे वळून पाहिले तर गेल्या पंच्याहत्तर वर्षांत डॉ. बाबासाहेबांचे हे इशारे किती अचूक ठरले, हे दिसून येते. संविधानात प्रत्येक भारतीय नागरिकासाठी मूलभूत कर्तव्ये दिली आहेत. त्यातील पहिलेच कर्तव्य म्हणजे–संविधानाचे पालन करणे आणि त्याचा आदर राखणे. दुर्दैवाने, हे कर्तव्य ना जनतेने समजून घेतले, ना राज्यकर्त्यांनी ते जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच संविधानात राज्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) दिली आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा, औद्योगिक व कृषी विकास, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, लोकसंख्यावाढीवर नियंत्रण, भ्रष्टाचारावर आळा, गरिबी निर्मूलन, बेघरांना घरे आणि आत्मनिर्भर भारताची उभारणी–या सर्व बाबींचा त्यात स्पष्ट उल्लेख आहे. मात्र प्रत्यक्षात या तत्त्वांची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली दिसत नाही.

संविधानात वारंवार दुरुस्त्या करून नवनवे कायदे करण्यात आले, पण त्यामागे संविधानाची मूलभूत मूल्ये केंद्रस्थानी ठेवली गेली नाहीत. परिणामी देश विकासाच्या मार्गावर जाण्याऐवजी असंख्य समस्यांच्या विळख्यात अडकला. आत्मनिर्भर होण्याऐवजी देश अनेक बाबतींत परावलंबी झाला आहे. संविधान हे देशहित आणि जनहित केंद्रस्थानी ठेवते. ते प्रत्येक नागरिकाला हक्कांची जाणीव करून देते–शिक्षणाचा हक्क, रोजगाराच्या संधी, सामाजिक, आर्थिक व राजकीय समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता. एकता व एकात्मतेद्वारे देश एकसंध राहावा, अशी त्याची भूमिका आहे. मात्र आजचा सामाजिक वास्तव पाहता द्वेष, तिरस्कार, जातीयवाद आणि धर्मवाद अधिक ठळकपणे दिसून येतो.



बहुजन सौरभ

गेल्या अनेक दशकांत संविधानाबद्दल समाजमनात आदर निर्माण करण्याऐवजी, संविधान आणि त्याच्या निर्मात्यांविषयी द्वेष पेरण्याचे काम झाले. त्यामुळे आज कुठे संविधानाची, तर कुठे संविधाननिर्मात्यांची विटंबना होताना दिसते. ही परिस्थिती चुकीच्या आणि स्वार्थी राज्यकारभाराचा परिणाम आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करूनही आज देशातील वास्तव विदारक आहे. दर्जेदार शिक्षणसंस्था, शाळा, रुग्णालये आणि आरोग्यसेवा यांचा अभाव आहे. जागतिक दर्जाचे एकही विद्यापीठ आपल्या देशात नाही. उच्च शिक्षणाचे प्रमाण सुमारे 21 टक्के आहे, तर विकसित देशांमध्ये ते 70 ते 80 टक्क्यांपर्यंत आहे. तंत्रज्ञानाच्या युगातही आपल्या देशात शिक्षण, रस्ते, शेतीसाठी मूलभूत सुविधा यांचा अभाव जाणवतो. डॉ. बाबासाहेबांनी व्यक्तीपूजेबाबतही गंभीर इशारा दिला होता. व्यक्तीपूजा ही देशासाठी घातक आहे, कारण देश म्हणजे एखादी व्यक्ती नसून, देशाचे भवितव्य हे मूल्ये, संस्था आणि लोकशाही प्रक्रियांवर अवलंबून असते. एखादा नेता स्वतःला देशापेक्षा मोठा समजू लागला, तर देश अधःपतनाच्या मार्गावर जातो, असे त्यांनी ठामपणे सांगितले होते.

आजची राजकीय परिस्थिती पाहिली तर डॉ. बाबासाहेबांचे शब्द अक्षरशः खरे ठरताना दिसतात. महानगरपालिका निवडणुकांपासून ते संसद व विधानसभांपर्यंत तिकीट न मिळाल्याने आंदोलन, बंडखोरी, पक्षांतर, नातेसंबंध तुटणे–अशा घटना सर्रास घडताना दिसतात. अनेकांना राजकारण म्हणजे लोकसेवा नसून संपत्ती कमावण्याचा सर्वात सोपा मार्ग वाटू लागला आहे.

भ्रष्ट आणि अपारदर्शक राजकारणामुळे स्वच्छ, मूल्याधिष्ठित राजकारण मागे पडले आहे. जर राजकारणात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कठोर कायदे असते, भ्रष्टाचार सिद्ध झाल्यास दीर्घकाळ राजकारणातून हद्दपार करण्याची व्यवस्था असती, तर आज दिसणारा हा गोंधळ निर्माणच झाला नसता. आज देशात गुन्हेगारी, भ्रष्टाचार, विषमता, अन्याय आणि अत्याचार वाढले आहेत. एका बाजूला प्रचंड संपत्तीचा साठा, तर दुसऱ्या बाजूला भीषण दारिद्र्य अशी विदारक दरी निर्माण झाली आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे जनता देखील अशाच भ्रष्ट लोकांच्या हाती सत्ता सोपवत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक नेते नव्हते, तर विलक्षण विद्वत्ता, दूरदृष्टी आणि आंतरदृष्टी लाभलेले एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी भविष्याचा वेध घेऊन जे इशारे दिले, ते आज वास्तवात उतरलेले दिसत आहेत. देशहिताच्या घोषणा दिल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात स्वार्थसाधनाच प्राधान्याने चालू आहे. आज गरज आहे ती डॉ. बाबासाहेबांच्या विचारांकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची, संविधान जपण्याची, लोकशाही मूल्ये रुजवण्याची आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित सामाजिक लोकशाही उभारण्याची. ■ ■



**विनोद सरदार**
**मो.9689847115**



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -५८

## बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बुद्धनगर टेकानाका नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा बुद्धनगर टेकानाका नागपूर हा पुतळा 2017 मध्ये दान देण्यात आला आहे. शेजारी चंद्रमनी बौद्ध पाली विहार आहे. दिनविशेषला येथील नागरिक विविध कार्यक्रम आयोजित करतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
9370773608

शाहीर सीमा पाटील व जॉली मोरे यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती सोहळा साजरा



**भोपाळ :** तलावांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य प्रदेशाची राजधानी भोपाळमध्ये, देशाच्या पहिल्या महिला शिक्षिका राष्ट्रमाता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम 'रजत जयंती ऑडिटोरियम' पंडित खुशीलाल शर्मा आयुर्वेदिक महाविद्यालय, कोलार-नेहरू नगर रोड, भोपाळ येथे आयोजित केला. कार्यक्रमाचे आयोजक आणि 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती समारोह समिती, भोपाळ'चे अध्यक्ष प्रभाकर ढोके (निवृत्त व्यवस्थापक, दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड) हे होते. शाहीर सीमा पाटील आणि सुप्रसिद्ध संगीतकार जॉली मोरे व त्यांच्या 25 सदस्यीय उत्कृष्ट कलाकारांच्या टीमने माता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती रमाई यांच्या जीवनावर आधारित संगीतमय नाट्य सादर केले. कार्यक्रमाला भोपाळ दक्षिण-पश्चिमचे लोकप्रिय आमदार भगवान दास सबनानी यांनी संबोधित केले आणि क्रांतिज्योती माता सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्याची घोषणा केली. कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजसेवक डॉ. मोहनलाल पाटील यांनीही संबोधित केले. यावेळी समाजसेवक सुनील बोरसे, रामू गजभिये आणि सुरेश जाधव हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संघमित्रा खैरनार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गौतमी हंसराज गोलाईत, योजना हर्षेश मेश्राम, निशा अरुण मेश्राम, दीपा, डॉ. राजेश मेश्राम, अभिमान सोनोने, रामू गजभिये, छाया मोरे, प्रभा ढोके, बी. जी. वानखडे आणि आशा शेषराव बसोड यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमामध्ये समाजासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचाही सन्मान केला .

# धम्मदूत भदंत संघरत्न मानके यांच्या वाढदिवसानिमित्त निघाली बाईक रॅली



**पवनी :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील बौद्धांचे धर्मगुरू तथा पय्या मेत्ता संघाचे संघानुशासक व महासमाधी महाविहाराचे विहाराधिपती आचार्य धम्मदूत भदंत संघरत्न मानके यांच्या 64 व्या वाढदिवसाच्या निमित्ताने पवनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एकत्रित व संयुक्तपणे कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच भदंत संघरत्न मानके यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील प्रदान केले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोरून भव्यदिव्य अशी बाईक रॅली पंचशील धम्मध्वजासह काढण्यात आली. तसेच ही बाईक रॅली पवनी वरून वैनगंगा नदीच्या पलीकडे सिंदपूरी येथील महासमाधी महाविहारात नेण्यात आली. तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी धम्मदूत भदंत संघरत्न मानके, भदंत धम्म शिखर, भदंत धम्मतप, भदंत महेंद्र रतन, भदंत देवानंद, भदंत चंद्र किर्ती भदंत मोग्गलायन, भदंत कौंडिण्य, श्रामनेर उपाली, श्रामनेर महानाम, श्रामनेर हर्ष किर्ती, डॉ. ज्ञानेश्वर रक्षक हे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत कर अधिकारी. म्हणून निवड झालेल्या पवनी तालुक्यातील मौजा बाचेवाडी येथील राखी मुहम्मद रंगारी हिचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन ॲड महेंद्र गोस्वामी यांनी केले. तर प्रास्ताविक मनोज बन्सोड यांनी केले. तसेच आभारप्रदर्शन डॉ. सुनील जिवनतारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जेष्ठ आंबेडकरी कार्यकर्ते ॲड. महेंद्र गोस्वामी, अरूण गोंडाणे, मनोज बन्सोड, माजी सभापती डॉ. सुनील जिवनतारे, बंडू रामटेके, भक्तराज गजभिये, सोनू रंगारी, लोमेश सुर्यवंशी, रूपचंद रामटेके, लक्ष्मीकांत तागडे, असित बागडे, संजिव भांबोरे, डॉ. प्रविण थुल, सुदेश वैद्य, कैलास गेडाम, बादल ठवरे, कांता दहिवले, प्रमिला बोरकर, प्रमिला टेंभूर्णे, प्रभा दहिवले, पुष्पा बोरकर यांनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा यांचे निधन



**पुणे :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष आणि बौद्ध साहित्य व मानवतावादी समाजसुधारकांच्या कार्यावर आधारित साहित्याची निर्मिती करणारे ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा( वय 87) यांचे आज, रविवारी दुपारी वृद्धापकाळाने पुण्यातील खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सोमवारी सकाळी नऊ ते साडेदहा वाजतापर्यंत त्यांच्या विमाननगर येथील निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी साडेअकरा वाजता येरवडा विद्युत दाहिनी या ठिकाणी अंत्यविधी पार पडला.

### धम्म कुटी बुद्ध विहाराची नवीन कार्यकारणी

**नागपूर :** मिसाळ ले आऊट जरीपटका नागपूर येथील धम्म कुटी बुद्ध विहार येथे नुकत्याच बुद्ध विहार समितीच्या द्विवार्षिक निवडणूका अटितटीच्या वातावरणात पार पडल्या. अध्यक्ष म्हणून सचिन वासनिक तर सचिव म्हणून चंद्रशेखर मेश्राम निवडून आले. इतर निवडून आलेले पदाधिकारी याप्रमाणे शाम खोब्रागडे उपाध्यक्ष, शांता डोंगरे सहसचिव, रामदास मोडक कोषाध्यक्ष, अनिता गजभिये उपाध्यक्ष, बाकी सर्व सदस्य धर्मपाल राऊत, प्रफुल्ल देशभ्रतार, शैलेश देशपांडे, राहुल शेंडे, शांता नितनवरे, मनोज श्राद्धे, विजय नितनवरे, सुखदेव शेंडे, सुरेश वासनिक नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.

### नवउन्मेषण साहित्य सभा स्त्री-शिक्षक सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांच्या जयंती साजरी



**नागपूर :** नवउन्मेषण साहित्य सभेच्या वतीने शुक्रवारला स्त्री-शिक्षणाच्या आद्य सहकारी फातिमा शेख व सावित्रीबाईफुले यांच्या संयुक्त जयंतीचा कार्यक्रम दत्तात्रयनगर येथे पार पडला. नवउन्मेषण साहित्य सभेच्या अध्यक्ष सुधा बामनपल्लीवार यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडलेल्या या कार्यक्रमात सत्यशोधक विचारवंत बाबा बीडकर व सत्यशोधक मीमांसक प्रा. शरद वानखेडे दोन्ही महामानवांच्या शैक्षणिक व सामाजिक भान जागरणाच्या कार्यावर विश्लेषक मांडणी केली व त्याची दंदात्मक भुमिका स्पष्ट केली. अध्यक्षीय मनोगतात सुधा बामनपल्लीवार यांनी नवउन्मेषण साहित्य सभा ही बहुजन लोकांच्या सर्वप्रकारच्या प्रबोधनासाठी मागील तीन वर्षांपासून सक्रिय आहे व असे उपक्रम दर महिण्यात राबविण्यात येतात, असे सांगितले कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे महासचिव विनोद उलीपवार यांनी केले तर आभार मालती वराडे यांनी मानले. यावेळी म. अंनिसचे राज्य उपाध्यक्ष इंजि. संजय शेंडे, राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये, विजय बाभुळकर, संजय पन्नासे, रवीद्र राऊत, संजय भुरे, संजय लाडे, रंजना कोल्हे व मेडपल्लीवार यांचेसह इतर सहकारी उपस्थित होते.

### दै. बहुजन सौरभ लेखाचे सामुहिक वाचन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



**रामटेक :** समता बुद्ध विहार, पटगोवारी ता. रामटेक जि. नागपूर येथील विहारात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी झाली. अध्यक्षस्थानी कृष्णा बोरकर तर प्रमुख उपस्थित अशोक मनगटे, नागोजी गजभिये, प्रभा जांभुळकर, सत्यफुला भिवगडे चंदा गजभिये, प्रमीला बंदेवार यांनी विचार व्यक्त केले. बहुजन सौरभमध्ये सावित्री बाईची स्त्री शिक्षणाचा ध्यास लेख सुरभी भिवगडे, अनुज गोपाल भिवगडे, सावितीबाई फुले स्त्रियांचे भविष्य घडवणारी क्रांती हा लेख. अथर्व प्रविण भिवगडे यांनी वाचून दाखविला. आभार भिवगडे यांनी आभार व्यक्त केले.

### भाऊसाहेब भोरे यांनी ज्ञानाच तीर्थस्थान निर्माण केले : ज्ञानेश्वर रक्षक



**नागपूर :** तीर्थस्थान म्हणजे पवित्र स्थान मानवी जीवनाला प्रेरणा देणारे. भाऊसाहेब भोगे यांनी ज्ञानार्जनांचे तिर्थस्थान ग्रामीण भागात बिकट परिस्थिती निर्माण केले. त्यांच कार्य अनेकांना जीवनाची नवी दिशा देणारे ठरले असे गौरवद्गार श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे जेष्ठ प्रचारक ज्ञानेश्वर रक्षक यांनी काढले. शिक्षणाची गंगा शिवशक्ती शिक्षण संस्था (वेणीकोठा) ता. कळंब, जि. यवतमाळ द्वारा गरीबाच्या झोपडी पर्यंत पोहचविणारे निष्काम कर्मयोगी भाऊसाहेब भोरे यांचा सपत्नीक पुतळा अनावर समारंभात प्रबोधन कातांना ज्ञानेश्वर रक्षक, आमदार बाळासाहेब मंगरूळकर, संस्थेचा मजबूत खांदा बाळासाहेब धांदे, वारकरी किर्तनकार शिवलिला पाटील, मोहन चोरे राष्ट्रीय प्रबोधनकार आणि अफाट जनसागर विनम्र नमन. कारण माझ्या वाढदिवसाची 5 जानेवारी ही अनोखी भेट होती.

## 'सो एको राजहंस' या बालनाट्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध



**नागपूर :** बालरंगभूमी परिषद, नागपूर शाखेद्वारे श्री साई सभागृह, शंकर नगर, नागपूर येथे आयोजित बहुभाषिक बालनाट्य महोत्सव, नुकताच उत्साहात पार पडला. या बहुभाषिक बालनाट्य महोत्सवात बुद्धिस्ट अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, नागपूर द्वारा 'सो एको राजहंस' हे पालि भाषेतील बालनाट्य सादर करण्यात आले. या बालनाट्याचे लेखन केले होते अश्विनी मोडक आणि दिशा गायकवाड यांनी. निर्देशक, संगीतकार आणि प्रकाश योजनाकार होते अशोक जांभुळकर. नेपथ्य यथार्थ गायकवाड यांचे होते, रंगभूषा संबोधी डोंगरे यांची तर वेशभूषाकार होती देवयानी देव. 'सो एको राजहंस' या पालि बालनाट्यात अरहान वासनिक, संबोधी डोंगरे, देवयानी देव, विशुद्धी डोंगरे, हर्षल कुंभारे, विहान तायवाडे, आदित्य डोंगरे, यथार्थ गायकवाड, असंग मोडक, आरांश मोडक, अयन मोडक, अन्वी मोडक, अनिमेष बनकर, मिष्टी मकेश्वर, प्रतित्य देव आणि सानवी चौधरी या बालकलावंतांनी अभिनय केला. बहुभाषीक बालनाट्य महोत्सवात उपस्थित प्रेक्षकांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरात 'सो एको राजहंस' या बालनाट्याला मनापासून प्रतिसाद दिला.

## गणपतराव गणविर आणि दमयंती गणविर यांच्या स्मरणार्थ आदरांजली



**नागपूर :** गणपतराव गणविर चारीटेबल ट्रस्ट द्वारा संचालित धम्माभिषेक महाविहार व वेलफेयर सेंटर आणि धम्माभिषेक अकादमी गोंदेखारी चुल्हाड बपेरा रोड ता तुमसर येथे संयुक्त विद्यमाने संस्थापक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी परिसरातील त्यांच्या चैत्याला पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी धम्माभिषेक महाविहार येथे परित्त संझायन धम्मदेसना आयोजित करण्यात आली उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी धम्माभिषेक महाविहार व वेलफेअर सेंटर च्या वाटचालीत स्मृतीशेष दमयंती व गणपतराव गणविर या संस्थापक द्वयाच्या कार्य कृती व आठवणी विषद करताना जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल. एन. स्मृती पंधरवडा व वर्तमान विषम काळात आंबेडकरी चळवळ या विषयावर मार्गदर्शन केले या वेळी धम्माभिषेक अकादमी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या निमित्ताने विजु गोंडाणे ॲड संजय गजभिये ॲड रचना गजभिये डॉ. सुरेश कोटांगले रविकांता कोटांगले मनोहर वासनिक शेखर बोरकर प्रेरणा बोरकर विष्णू मेश्राम वसंत गेडाम संजय जांगळेकर राकेश गोंडाणे योगीराज नंदेश्वर आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## शनिवारचा आर्ट कट्टा या संकल्पने अंतर्गत नवीन वर्षातील प्रथम प्रात्यक्षिक श्रृंखला सुरु




**नागपूर :** नागपूर स्कूल ऑफ आर्टस तर्फे राबविण्यात येणारा 'शनिवारचा आर्ट कट्टा' या संकल्पने अंतर्गत नवीन वर्षातील प्रथम प्रात्यक्षिक श्रृंखला सुरू करण्यात आली. अजनी येथील रेल्वे मेन्स हायस्कूलच्या पटांगणात हा कार्यक्रम पार पडला. आजचे पहिले प्रात्यक्षिक सुप्रसिद्ध शिल्पकार विनायक निटटुरकर, सहाय्यक अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय नागपूर हे होते.विदर्भातील आणि विशेषतः नागपूरमधील कला विद्यार्थी व रसिकांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो. आयडियल फाईन आर्ट ॲड कल्चरल एज्युकेशन सोसायटी तर्फे नागपूरच्या अजनी येथील निसर्गरम्य पहाटेस हा कार्यक्रम पार पडला. संस्थेतर्फे आज पर्यंत 28 कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. मागील वर्षात सुप्रसिद्ध चित्रकार बिजय बिस्वाल तसेच पद्मश्री वासुदेव कामत यांचे प्रात्यक्षिक आयोजित केल्या गेले होते. शनिवारी झालेल्या शिल्पकलेच्या प्रात्यक्षिकात विद्यार्थी व कलाकार रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. विजय ठाकरे यांनी मॉडेलच्या स्वरूपात आपला सहभाग नोंदविला. प्रा. अमोल पाटील, भूपेंद्र कवडते, छायाचित्रकार राजेंद्र हर्षवर्धन, प्रदीप ठाकरे, प्राचार्या साक्षी खानोरकर, प्राध्यापक हरीश भिशीकर, अमेय सोनारकर, मुख्याध्यापिका अर्चना राहते, सुधीर चौधरी, वंदना देशमुख, विशाल चव्हाण, किरण भावे आणि चित्रकला महाविद्यालयातील कला विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

## नमो बुद्धाय ग्रूप, मनीषनगरद्वारे सावित्रीबाई फुले, फातीमा शेख जयंती



**नागपूर :** 'नमो बुद्धाय ग्रूप' द्वारे जयदुर्गा सोसायटी, एनआयटी गार्डन परिसरात सावित्रीबाई फुले, फातीमा शेख यांची संयुक्त जयंती संपन्न झाली. सुरुवात माया चव्हाण याच्या भीमगीताने झाली. मागील चार वर्षापासून जयंती व अन्य सांस्कृतीक कार्यात धम्मसंगोष्टीचे पाठबळ लाभत आहे, असे उषा नरेश धोपटे यांनी प्रास्थाविक भाषणात विचार व्यक्त केले. सावित्रीबाई फुले, फातीमा शेख यांच्या सोबत माता रमाई, राजमाता जीजाई यांची जयंती सुद्धा आपण साजरी केली पाहिजे, कारण त्यांच्याच संघर्षमय कार्यामुळे आज महिलांना माणूस म्हणून ओळखले जात आहे. सावित्रिबाईनी शिक्षणाला श्रेष्ठत्व दिले. माणसाला अन्नाची तशीच शिक्षणाची गरज आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये समजून घेण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण महिलांच्या मुक्तीचे साधन असून सर्वांगीण विकासाचे सूत्र असल्याचे सावित्रीबाईनी जाणले होते. असे सभेच्या वक्त्या डॉ. सरोज डांगे यांनी विचार व्यक्त केले. सत्ता, संपती व प्रतिष्ठेसाच्या हव्यासापोटी पुरुषसत्ताक पद्धती व जाती व्यवस्था निर्माण करण्यात आली. व्यवस्थेची स्त्री गुलाम बनवली. त्यामुळे देशाचे प्रचंड नुकसान झाले. आजही 50 टक्के भागीदार असलेल्या स्त्रीयांचा वाटा कुठे आहे? म्हणून स्त्रियांचे संगठन असले पाहिजे आणि ते घरापासून स्थापित झाले पाहिजे, असेही डॉ. डांगे म्हणाल्या.

स्त्रिया गुलामीत, परावलंबीही होत्या. अशा काळात सावित्रीबाई, फातीमाचा जन्म झाला. तशा व्यवस्थेत सावित्रीबाई प्रथम शिक्षिका, मुख्याध्यापिका, कवी, संशोधक बनल्या. स्त्रीवादाच्या जननी म्हणून त्यांची आजही ओळख आहे, असे सभेच्या अध्यक्षा रेखा नाईक यांनी विचार व्यक्त केले. सभेत उषा धोपटे, वर्षा शामकुवर, नंदा बोरकर आणि आम्रपाली वाघमारे यांनी गीते सादर केलीत. संचालन शारदा देवळे आणि आभार अंकिता शामकुवर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अल्का नंदू नगराळे, अल्का मिलिंद जाधव, नलिनी शेंडे, वर्षा शामकुवर, गीता तेंभुर्णे, मंदाकिनी पाटील, चंद्रकला झामरे, वैशाली वैद्य, मिना कांबळे, प्रमिला बांबोडे, सारिका सबाने, संघमित्रा साखरे यांनी सहकार्य केले. सभेत धम्मसंगोष्टीचे अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

## गरीब मुलांच्या स्पर्धा परीक्षेचा खर्च समाजाने उचलावा : विभूतीचंद्र गजभिये



**नागपूर :** आपण ज्या गावातून आलो आहोत त्या गावासाठी ठोस शैक्षणिक धोरणाची रूपरेषा तयार केली पाहिजे. समाजात वाढत असलेली गरीबी, दारूचे वाढते व्यसन आणि होत असलेले धर्मांतर यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन विभूतीचंद्र गजभिये यांनी केले.

ते बहुजन हिताय संघाच्या 453 व्या साप्ताहिक सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. इंदोरा येथे बौद्ध विहार असतानाही त्याच परिसरात धर्मांतर होत असल्याची बाब चिंताजनक असून, यामागील सामाजिक व आर्थिक कारणांचा शोध घेतला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. श्रीमंत वर्गासोबतच दुर्बल घटकांनाही सोबत घेऊन समाज उभारणी करावी लागेल, असे गजभिये म्हणाले. यावेळी बोलतांना विजय सुरवाडे यांनी मागील सभांमध्ये उपस्थित झालेल्या प्रश्नांवर सातत्याने चर्चा झाली पाहिजे, असे मत व्यक्त केले. तर दामोधर लोखंडे यांनी वज्जी संघाच्या आदर्शानुसार संघटितपणे वाटचाल करण्याची गरज अधोरेखित केली. ते वंदना संघ, बुद्ध विहार समन्वय समिती व धम्म संगोष्ठीच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजासमोरील सामाजिक व राजकीय आव्हाने पेलणे अत्यंत आवश्यक असून, पुढील दोन पिढ्यांचे भविष्य लक्षात घेऊन कार्य करावे लागेल. तथागत गौतम बुद्ध यांचे तत्त्वज्ञान व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी 3 ते 4 कोटी रुपयांचा निधी उभारणे गरजेचे असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

नवीन शैक्षणिक धोरणावर प्रा. देवीदास घोडेस्वार यांनी पुस्तक लिहिले असून, ते वाचून त्याचे सखोल आकलन करणे आवश्यक असल्याचेही वक्त्यांनी सांगितले. ही सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, लष्करीबाग येथे पार पडली. सभेचे संचालन व आभार ॲड. हंसराज भांगे यांनी मानले. सहकार्य देविदास राऊत, अरुणा पाटील, विजय सुरवाडे, मंगला राऊत, सी.एम. चव्हाण व प्रकाश सोनटक्के यांनी केले.

## हिंगणा तालुका ग्राहक पंचायत कार्यकारिणी अध्यक्ष वसंतराव राडे तर प्रा. रामटेके सचिव



**हिंगणा :** अखील भारतीय ग्राहक पंचायतचे नागपूर जिल्हा अध्यक्ष गणेश शिरोळे यांच्या अध्यक्षतेखाली वानाडोंगरी येथील अरुण कैकाडे याचे निवासस्थानी हिंगणा तालुका ग्राहक पंचायतची बैठक झाली. याप्रसंगी नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष संजय धर्माधिकारी, सचिव प्रकाश भुजाडे, जिल्हा मार्गदर्शक विनायक इंगळे, जिल्हा उपाध्यक्ष बाबुभाई शेख व हिंगणा तालुका अध्यक्ष वसंतराव राडे उपस्थित होते. यावेळी हिंगणा तालुका ग्राहक पंचायतची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. हिंगणा तालुका अध्यक्षपदावर वसंतराव राडे तर प्रा. दिपक रामटेके यांची तालुका सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली. सर्वप्रथम दिवंगत गौरीताई चांद्रयान यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संजय धर्माधिकारी, प्रकाश भुजाडे व गणेश शिरोळे यांनी मार्गदर्शन केले. ॲड. अर्चना सोनारे, हाजी बब्बुभाई शेख व पत्रकार नामदेव आमनेरकर यांचा नागपूर जिल्हा कार्यकारिणीमध्ये समावेश करण्यात आला. नागपूर जिल्हा अध्यक्ष गणेश शिरोळे यांनी हिंगणा तालुका व वानाडोंगरी शहर कार्यकारिणी जाहीर केली. प्रास्ताविक हाजी बब्बुभाई शेख यांनी तर संचालन विनायक इंगळे व आभार प्रा. दिपक रामटेके यांनी मानले. याप्रसंगी आशा बुरनुरे, प्रज्ञा रामटेके, अंजुषा मुळे, जयवंती कैकाडे, बेबी बिल्लोरे, मंदा तिवसकर, कुसुम राऊत, देवका दुरबुडे, प्रमिला कैकाडे, मीनाक्षी बेंबारे, आशा गजभिये, साधना ढोडरे, बाबूलाल तामगाडगे, अरुण कैकाडे, सतीश सातपुते, प्रकाश लारोकर, संकेत शेलुकर, नंदू पोटे, अमर सातपुते, राजेंद्र सांबारे व वसंता राडे उपस्थित होते.

# देवाचा पुजारी सगळ्यात जास्त नास्तिक : अभिनेते वैभव मांगले

### वाढत्या असहिष्णूतेवरही व्यक्त केली चिंता, सहावा नास्तिक मेळावा

**पुणे :** देवाच्या पुजाऱ्याला माहीती असते की देव नाही. हे केवळ पैसे कमावण्याचे साधन आहे, म्हणूनच ही लोकं सामान्य माणसाला देवपूजेच्या आहारी घालून गडगंज श्रीमंत होतात. आज कुठल्याही मोठ्या देवस्थानचे ट्रस्टी हे सर्व नास्तिक लोक आहेत. अशा लोकांनी फक्त श्रद्धेचा बुरखा पांघरलेला आहे, असे परखड मत अभिनेते वैभव मांगले यांनी व्यक्त केले.

शहीद भगतसिंग विचारमंच आयोजित सहाव्या नास्तिक मेळाव्यात ते बोलत होते. लेखक डॉ. शंतनू अभ्यंकर, इतिहास अभ्यासक डॉ. टी. एस. पाटील, अभ्यासक य. ना. वालवनकर यावेळी उपस्थित होते. मांगले पुढे म्हणाले की, आज आपण खुप असहिष्णु होत चाललो आहोत. ते मला जास्त धोकादायक वाटते. एक गाय कोणीतरी मारली असा संशय घेऊन माणसाची सामूहिक हत्या केली जाते. ज्या गाई रस्त्यावर फिरून मिळेल ते खातात, पोटात प्लॅस्टिक अडकून त्यांचा मृत्यू होतो, त्यांच्याविषयी यांना काहीच वाटत नाही पण कुठल्यातरी

**श्रद्धेचा केवळ बुरखा पांघरलाय - वैभव मांगले**

'देव अस्तित्वात नाही, हे पुजाऱ्याला माहीत असते. त्यांच्यासाठी हे केवळ पैसे कमावण्याचे साधन आहे. म्हणूनच हे लोक सामान्य माणसाला देवपूजेच्या आहारी घालून गडगंज श्रीमंत होतात.

BY ऑनलाइन लोकमत
MARCH 17, 2019

93 26 36 53 96



धर्मातल्या माणसाने गाय मारली म्हणून त्यांची हत्या केली जाते, हा किती लाजिरवाणा प्रकार आहे ज्या विठ्ठलाला पाहून तुकाराम महाराजांनी अखंड गाथा रचली, ज्ञानेश्वरांना आता विश्वात्मके असे म्हणणारे पसायदान लिहावंस वाटले या श्रद्धेने यांनी केवढे मोठे साहित्य निर्माण केले आहे. आज मला वाईट वाटतं की लोकं शिर्डीला चालत जातात काही काम नाही का लोकांना त्यांच्या हाताला काम नाही म्हणूनच हे चाललंय का 'हे सगळे माझे भाषण जर कोठे पाठवले तर मला भीती आहे की कुठूनतरी लोक येऊन माझ्यावर हल्ला करतील. इतके आपण असहिष्णु झालो आहोत का? विद्येच माहेरघर असलेल्या पुण्यात दाभोळकरांची हत्या होते. तिथे आपण काहीच करू शकलो नाही आहोत' 'अज्ञान मान्य करण हा विज्ञानाचा आधार आहे. धर्म अज्ञानच मान्य करत नाहीय जे आहे हे पूर्वीपासून असच आहे, असा धर्माचा अर्थ लावला जातोय' एखादी घटना का घडते त्याच्यामागचे लॉजिक मला कळले पाहिजे. ज्या कुठल्या देवस्थानाला मोठमोठे व्यापारी लोक जातात आणि पार्टनरशिपमध्ये बोली लावतात, ते देवाला चालते का? जीवनातील प्रत्येक गोष्टीला लॉजिक असते ते शोधायला आपण लोकांना प्रवृत्त करू या.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करु या !

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648